वर्ष ११ वें अंक १ ला

१५ ऑगस्ट १९५९

# संजीवन

## जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक



संजीवन कार्यालय, श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी – २

आपण जागरूक असूं, तर आपल्या भोंवतालच्या व्यक्तींपैकीं प्रत्येकजण हा, आपल्या अस्तित्वाचीं एक किंवा अनेक अंगें प्रतिबिंबित करणाऱ्या आरशाप्रमाणें असतो. त्यापासून फायदा कसा करून घ्यावयाचा हें आपणांस माहीत असेल, तर आपल्या प्रगतीच्या दृष्टीनें ती एक फार मोठी मदत असते; आणखी त्यांतच जर ती आरसारूपी व्यक्ति कळकळीची व आपणांविषयीं सदिच्छा बाळगणारी असेल, तर त्यापासून मिळणाऱ्या साह्याचें मूल्य विशेषच असतें.

*

स्पष्टदर्शी, सर्वसमावेशक, सर्व वैयक्तिक प्रतिक्रियारहित अशी अथक परोपकारबुद्धि असणें, हाच भगवंतावर प्रेम करण्याचा आणि पृथ्वीवर त्याची सेवा करण्याचा सर्वश्रेष्ठ मार्ग आहे.

परोपकारबुद्धि याचा अर्थ, विचार आणि वाणी यांमधून सहज उत्स्फूर्त होणारी खरीखुरी परोपकारबुद्धि असें मला म्हणावयाचें आहे. आपण कोणी मोठे आहों अशा प्रकारची, दुसऱ्याला कमी प्रतीचें भासविणारी भावना ज्यामध्यें सामान्यत: मिसळलेली असते अशी आणि मानवी दर्प पोसण्याला पार्श्वभूमिप्रमाणें असणारी व परोपकारबुद्धीचें पांघरूण घेतलेली भोंदू कृति मला म्हणावयाची नाहीं.

–– श्रीमाताजी

वर्ष ११ अंक १ ला    १५ ऑगस्ट १९५९

# संजीवन

## जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक

संपादकः

भालचंद्र लिमये

**संजीवन कार्यालय**

**श्रीअरविन्द आश्रम, पाँडीचेरी**

मनुष्यानें पुढें पुढें गेलें पाहिजे, प्रगति केली पाहिजे, अधिक उच्च गेलें पाहिजे; सुख आणि वैयक्तिक लाभ यांच्या वखवखलेल्या भुकेपेक्षां उंच चढलें पाहिजे. पण हें सर्व, शिक्षेच्या भीतीनें अथवा परलोकीं सोसाव्या लागणाऱ्या दंडाच्या भयानेंहि नव्हे, तर सौंदर्यदर्शी नवदृष्टीच्या विकासामुळें, सत्य आणि प्रकाश यांच्या तृष्णेमुळें केलें पाहिजे. स्वतःला विशाल, प्रकाशयुक्त केल्यानें, स्वतःमधील उन्नतीची ज्योत प्रज्वलित केल्यानेंच केवळ, आंतरिक शांति आणि चिरंतन सुख यांची प्राप्ति होऊं शकेल, हें समजून मनुष्यानें पुढें पुढें गेलें पाहिजे.

मनुष्यानें उंच चढलें पाहिजे आणि विशाल झालें पाहिजे–उंच चढा–स्वतःस विशाल करा.

—श्रीमाताजी

**वार्षिक वर्गणी—यथाशक्ति.**

संपादक—भालचंद्र लिमये.

प्रकाशक—'संजीवन कार्यालय', **श्रीअरविंद आश्रम, पांडीचेरी.**

मुद्रक—**श्रीअरविंद आश्रम प्रेस, पांडीचेरी.**

569/7/59/850



श्रीअरविंद

# १५ ऑगस्ट १९५९

परमश्रेष्ठ देवतेनें, परमश्रेष्ठ आणि आद्या महाशक्तीनें सर्व कांहीं निर्मिलें जाहे; ज्याप्रमाणें सर्वांमध्यें ती निवास करते, त्याप्रमाणें सर्वांचा उगम तिच्यापासून होतो, सर्व कांहीं तिच्यामुळें आणि तिच्यामध्येंच रहातें. सर्व प्रज्ञा आणि ज्ञान हें तिचेंच ज्ञान आणि प्रज्ञा आहे, सर्व सामर्थ्य हें तिचेंच सामर्थ्य आहे; सर्व संकल्प आणि शक्ति, तिचीच शक्ति आणि संकल्प आहे. सर्व क्रिया ही तिचीच क्रिया आहे, सर्व हालचाल ही तिची हालचाल आहे. सर्व जीव तिच्याच अस्तित्वशक्तीचे अंशभाग आहेत.

—श्रीअरविंद

# अनुक्रमणिका


| विषय | | पान |
|---|---|---|
| १ प्रार्थना आणि ध्यान | श्रीमाताजी | ५ |
| २ मातृवाणी | श्रीमाताजी | ८ |
| ३ थोर पुरुष आणि अवतारी व्यक्ती | श्रीअरविंद | १२ |
| ४ कामविकार-आहार-निद्रा | श्रीअरविंद | १७ |
| ५ स्वराज्य | श्रीअरविंद | २१ |
| ६ श्रीअरविंद वाङ्मय | मा. पुं. पंडित | २५ |
| ७ श्रीअरविंदांच्या जीवनांतील घटना-प्रवाह | शिशिरकुमार मित्र | २९ |
| ८ वाचकांचे प्रश्न | रेवान् | ३६ |
| ९ गीतेची शिकवण | श्रीअरविंद | ३८ |
| **विद्यार्थी विभाग** | | |
| १० बोधकण | | ४१ |
| १) तरुणांना एकच उपदेश | श्रीअरविंद | |
| २) खरें बालक व्हा | श्रीमाताजी | |
| ३) काळाशीं मैत्री करा | श्रीमाताजी | |
| ४) आनंदी रहा व आनंद द्या | श्रीमाताजी | |
| ११ अकबर-औरंगजेब (संवाद) | श्री० नलिनीकांत गुप्त | ४३ |
| १२ अधिक आरोग्यमय जीवनाकडे—— | प्रणवकुमार भट्टाचार्य | ४६ |
| १३ साहित्य-सत्कार | | ४९ |
| १४ आश्रम-वृत्त | | ५१ |

वर्ष ११ अंक १ ला                                                                 १५ ऑगस्ट १९५९

# संजीवन



**तमसापलीकडील उच्चतर ज्योति पहात,**
**देवतांमधील दिव्य सूर्याप्रत, सर्वोच्च ज्योतिप्रत आम्ही आलो.**

**ऋग्वेद–१. ५०. १०**

---

## प्रार्थना आणि ध्यान

जिनिव्हा–६ मार्च १९१४

त्यांच्या कष्ट यातनांमुळें तीव्र दुःख भोगून, मी तुझ्याकडे वळलें आहे; समस्त शांति आणि सुख यांचें उगमस्थान असलेल्या दिव्य प्रेमाचा थोडासा तरी अंश त्या दुःखयातनांच्या ठिकाणीं आणून, त्या दूर करण्याचा प्रयत्न मी करीत आहे. दुःखकष्टांपासून पळून जातां कामा नये, किंवा त्यांना वाढविण्यांत आनंदहि वाटतां कामा नये, त्यांच्याविषयीं प्रेमहि वाटतां कामा नये; तर त्यांच्यामध्यें पुरेसें खोल शिरून, त्यांचा साधन म्हणून उपयोग करून घेण्यास आम्हीं शिकलें पाहिजे; आणि सनातन चैतन्याचीं द्वारें स्वबलानें उघडण्याचें आणि तुझ्या निर्विकार एकत्वाच्या स्थिर शांतीमध्यें प्रवेश मिळवून देण्याचें सामर्थ्य या साधनामध्यें आणण्यास आम्हीं शिकलें पाहिजे.

बाह्य आकाररूपांची अशाश्वतता आणि तुझ्या सारभूत एकत्वाची सत्यता यांचा विचार केला असतां, भावनात्मक आणि शारीरिक आसक्तीमुळें व्यक्तींना विरहकाळीं होणाऱ्या व्यथा एका दृष्टीनें निश्चितच अगदीं बालिश वाटतात; पण दुसऱ्या दृष्टीनें पाहिलें असतां हीच आसक्ति, हीच व्यक्तिगत स्नेहभावना म्हणजे, ज्या मूलभूत एकत्वाकडे मनुष्य न कळत जात आहे तें एकत्व, शक्य तितक्या प्रमाणांत, बाह्य जीवनांतहि साध्य करण्याचा माणसानें अजाणतां केलेला प्रयत्न, असें नाहीं कां म्हणतां येणार? अगदीं याच कारणास्तव, वियोगानें निर्माण होणारें दुःख म्हणजे ही बाह्य चेतना ओलांडून जाण्याचें आणि या वरवरच्या

आसक्तीच्या जागीं तुझ्या सनातन एकत्वाचा सर्वांगीण साक्षात्कार घडवून आणण्याचें, एक अतिप्रभावी साधन असें म्हणतां येणार नाहीं कां ?

हीच गोष्ट मी सर्वांच्यासाठीं इच्छीत होतें; सर्वांसाठीं आर्ततेनें वांछीत होतें; आणि तुझ्या विजयाची खात्री असल्यानें, तुझ्या जयाविषयीं निश्चिति असल्यानें, त्यांचे दुःखकष्ट मीं तुझ्याकडे सोंपविले. त्यांच्यावर खरा प्रकाश पाडून तूं ते दूर कर.

हे प्रभो, अशी कृपा कर कीं, स्नेहभाव आणि कोमलता यांच्या सौंदर्याचें, उज्ज्वल ज्ञानामध्यें रूपांतर होऊन जाईल.

प्रत्येक घटनेमधून सर्वोत्तम परिणाम घडून येईल आणि तुझ्या प्रसन्न शांतीचें साम्राज्य अखिल पृथ्वीवर पसरेल असें वरदान दे.

★

'कागामारु' जहाजावर
७ मार्च १९१४

अत्यंत अद्‌भुत रक्षकाच्या रूपानें काल तूं आमच्या सन्निध होतास; सर्वांत बाहेरच्या थरावरील अभिव्यक्तीमध्येंहि तुझ्या आज्ञेचा विजय व्हावा अशी अनुमति तूं दिलेली आहेस. त्यामुळें हिंसेला शांतीनें आणि क्रूरतेला सौम्यवृत्तीनें उत्तर दिलें गेलें; आणि जेथें दुर्भाग्य अटळ होतें, तेथें तुझ्या शक्तीचा गौरव झाला. हे प्रभो, किती उत्साहपूर्ण कृतज्ञतेनें मीं तुला अभिवादन केलें ! तुझ्याचकरितां व तुझ्या नांवाकरितां जगण्यास, विचार करण्यास आणि कार्य करण्यास आम्हांला सामर्थ्य मिळेल, केवळ विचारांमध्यें व संकल्पांमध्यें नव्हे, तर प्रत्यक्ष सर्वांगीण कार्यसिद्धींमध्येंहि आम्हांला शक्ति मिळेल, याचें तें मला निश्चित आश्वासन वाटलें.

या प्रातःसमयीं नेहमींच्याच, एकच एक आकांक्षेनें माझी प्रार्थना तुझ्याकडे वर येत आहे. इतक्या शक्तिशाली आणि कार्यशाली रूपामध्यें, मीं तुझेंच प्रेम जगावें, त्याचाच प्रकाश सर्वत्र इतका प्रसृत करावा कीं त्यामुळें आमच्या सान्निध्यामध्यें सर्वांना सुरक्षितता वाटावी, नवजीवन मिळावें, नवा उत्साह वाटावा, उन्नत आणि प्रबोधित वाटावें. अस्वस्थ जीवन शमविण्याची, दुःख कष्ट दूर करण्याची, शांति आणि स्थिर विश्वास उत्पन्न करण्याची, तापसंताप मिटवून त्यांच्या जागीं खऱ्या एकमेव सुखाची—जें सुख नेहमीं तुझ्याचमध्यें निवास करतें आणि जें कधींच कोमेजत नाहीं, अशा सुखाची, आनंदाची–भावना प्रस्थापित करण्याची शक्ति मिळावी ही माझी अभीप्सा आहे...... प्रभो, अद्‌भुत सुहृदा, सर्वशक्तिमान गुरुदेवा, आमच्या समस्त अस्तित्वामध्यें प्रवेश कर, केवळ तूंच त्यामध्यें निवास करशील आणि त्याच्याद्वारां केवळ तुझाच आविष्कार होईल इतकें त्याचें सर्वांगीण परिवर्तन कर.

★

८ मार्च १९१४

हे प्रभो,

ज्यावेळीं प्रशांत सूर्योदयामुळें माझ्यामधील सर्वकांहीं शांत आणि नीरव झालें होतें, ज्यावेळीं मी तुझ्याविषयीं जागृत होऊन माझ्यामध्यें केवळ तूंच निवास करीत होतास, त्याक्षणीं

मला असें वाटलें कीं, या जहाजावरील सर्व व्यक्तींना माझ्यामध्यें धारण करून, समान अशा प्रेमाचें त्यांना मीं आवरण घातलेलें आहे आणि त्यामुळें त्यांच्या प्रत्येकाच्यामध्यें तुझ्या चेतनेचा कांहीं अंश उदित होणार आहे. तुझ्या दिव्य शक्तीचा आणि अजिंक्य प्रकाशाचा इतक्या तीव्रतेनें मला पूर्वीं फारशा वेळां अनुभव आलेला नव्हता; आज पुनश्च एकदां माझा आत्म-विश्वास सर्वांगीण झाला आणि माझें सानंद समर्पण विशुद्ध झालें.

हे प्रभो, तूं सकल दुःखहर्ता, समस्त तिमिरविनाशक आणि परम शोकनिवारक आहेस. या जहाजामध्यें ज्यांनीं आश्रय घेतलेला आहे, त्या सर्वांच्या हृदयामध्यें तूं नित्य निरंतर उपस्थित रहा; त्यामुळें तुझें वैभव पुनश्च एकदां प्रकट होईल.

★

९ मार्च १९१४

जे लोक तुझ्याचकरितां आणि तुझ्याचमध्यें जीवन जगतात, त्यांची भौतिक परिस्थिति, त्यांच्या संवयी, त्यांचें परिसर बदललें, तरी ते सर्वत्र एकच वातावरण अनुभवूं शकतात; ते जेथें जातील, तेथें स्वतमःध्यें तें वातावरण घेऊन जातात; त्यांचा विचार नित्य निरंतर तुझ्यावर केंद्रित झालेला असतो; सर्वच ठिकाणीं त्यांना आपल्या घरच्यासारखें वाटतें; कारण सर्वत्र ते तुझ्याच सदनामध्यें असतात. नवीन वस्तु आणि नवीन देश यांच्यांतील नावीन्य, अदृष्टपूर्वता किंवा चित्रविचित्रता पाहून त्यांना आश्चर्य वाटत नाहीं; कारण त्यांना प्रत्येक वस्तूमध्यें, सर्वांच्या ठिकाणीं तुझाच आविष्कार प्रतीत होतो आणि तुझें सदा अनुभवास येणारें शाश्वत वैभव रेतीच्या लहानशा कणांतहि दृष्टीस पडतें. सर्व पृथ्वी तुझें स्तुतिगान करीत आहे; अंधःकार, दुःख आणि अज्ञान असूनहि या सर्वांच्यामधून तुझ्याच प्रेमाचें वैभव आम्ही पाहूं शकतों आणि त्याच्याशीं अविरत आंतरिक संबंध अनुभवूं शकतों.

हे प्रभो, मधुर स्वामी, हा सर्व अनुभव मला या जहाजावर एकसारखा येत आहे. ज्या अवचेतनेची निष्क्रियता जिंकून, तुझ्या दिव्य उपस्थितीची जागति तेथें आणावयाची आहे, त्या अवचेतनेच्या लाटांवर, तुझ्या वैभवाची ग्वाही देण्यासाठीं तरंगत असलेलें जणुं मंदिर म्हणजेच हें जहाज आहे, किंवा अद्‌भुत शक्तीचें तें एक धाम आहे असें मला वाटत आहे.

हे अनिर्वचनीय सनातन प्रभो, मी ज्या दिवशीं तुला प्रथम जाणलें, तो दिवस खरोखर किती भाग्याचा !

पण सर्व दिनांमध्यें, तो दिन सर्वांत सुभाग्याचा ठरेल, जेव्हां शेवटीं अखिल पृथ्वीच जागृत होऊन, तुला जाणून घेईल आणि केवळ तुझ्याचस्तव जीवनधारणा करील.

—श्रीमाताजी

# मातृवाणी

(मागील अंकावरून पुढें.)

**"पण बसून ध्यान करणें ही एक अत्यावश्यक साधना नाहीं काय? आणि अशा साधनेनें अधिक उत्कट नि गाढ संयोग घडून येत नाहीं काय?**

तें संभवनीय आहे. तथापि केवळ साधनेसाठीं साधना हें आपलें प्राप्तव्य नाहीं. आपलें ध्येय हें आहे : जें कांहीं आपण करतों त्यांत, आपल्या साऱ्या कर्मांत, सर्व काळीं आणि प्रतिक्षणीं आपली जाणीव, आपलें चित्त भगवंतावर केंद्रित करून ठेवतां आलें पाहिजे. येथील आश्रमांत कांहीं साधकांना ध्यान करण्यास सांगण्यांत आलें आहे; तसेंच दुसरे कांहीं साधक असे आहेत कीं, ज्यांना ध्यान करण्यास मुळीं सांगण्यांत आलेलेंच नाहीं. पण त्यावरून अशी कल्पना करतां कामा नये कीं, ध्यान न करणारे साधक प्रगति करीत नाहींत. ते सुद्धां साधना करीत असतात; मात्र त्यांची साधना वेगळ्या प्रकारची असते. भक्तिभावानें आणि आंतरिक समर्पणवृत्तीनें कर्म आचरणें, कार्य करणें ही सुद्धां एक प्रकारची आध्यात्मिक साधनाच आहे. केवळ ध्यान करीत असतांनाच नव्हे, तर सर्व प्रकारच्या परिस्थितींत आणि समग्र क्रियाशील जीवनांतहि भगवंताशीं अविरत संयोग पावणें हें अंतिम गंतव्य आहे.

कांहीं लोक जेव्हां ध्यान करावयास बसतात, तेव्हां त्यांना अशी एक अवस्था येते कीं ती त्यांना फारच आकर्षक व आनंददायक वाटते. त्या अवस्थेंत ते आत्मसंतुष्ट राहतात व त्यांना जगाचा विसर पडतो; पण जर कां त्यांच्या ध्यानांत कांहीं व्यत्यय आला, तर त्यांचें ध्यान संपुष्टांत येतें, त्यांना राग येतो, ते प्रक्षुब्ध होतात–कारण कां तर त्यांचें ध्यान भंगलें! आध्यात्मिक साधनेचें किंवा आध्यात्मिक प्रगतीचें हें लक्षण नव्हे. कांहीं लोकांच्या वागण्यावरून असें दिसतें कीं, त्यांची अशी भावना आहे कीं, भगवंताचें आपल्यावर कांहीं ऋण आहे आणि ध्यानरूपानें आपण त्याची परतफेड करीत आहोंत. आठवड्यांतून एकदां चर्चला जाऊन देवाचें देणें देऊन टाकलें असें मानणाऱ्या ख्रिस्त्यांप्रमाणेंच त्यांची स्थिति असते.

ध्यानमग्न होण्यास जर तुम्हांस प्रयास करावे लागत असतील, तर आध्यात्मिक जीवन जगण्यास लागणारी पात्रता येण्यास अजून तुम्हांला बराच अवकाश आहे असें समजा. उलट जेव्हां ध्यानावस्थेंतून बाहेर येणेंच तुम्हांला जड होऊन बसतें, तेव्हां तुमचें ध्यान हें, तुम्हीं आध्यात्मिक जीवनामध्यें प्रवेश केल्याचें खरें चिह्न असूं शकेल.

हटयोग आणि राजयोग यांसारख्या मार्गांना अनुसरून साधना करून देखील, त्याचा आध्यात्मिक जीवनाशीं मुळींच संबंध नाहीं, असें होऊं शकतें. हठयोगानें शरीर-संयम साध्य होतो, तर राजयोगानें मन:संयम सिद्ध होतो; पण आध्यात्मिक जीवनांत प्रवेश करणें म्हणजे समुद्रांत उडी टाकल्याप्रमाणें, भगवंतामध्यें उडी घेण्यासारखें आहे. एवढें केलें म्हणजे संपलें नाहीं, तर ती केवळ अगदीं सुरुवात झाली. कारण, भागवत जीवनामध्यें उडी घेतल्यानंतर त्याच्याचमध्यें नेहमीं कसें रहावयाचें हें तुम्हीं शिकलें पाहिजे. हें कसें करावयाचें? "मी

कुठें पडेन, माझी काय दशा होईल" असा कसलाहि विचार न करतां, तुम्हीं केवळ सरळ उडी घेतली पाहिजे. तुमच्या मनाची डळमळीत स्थिति हीच तुमच्या आड येते. तुम्ही नुसती उडी घ्यावयाची, काय होईल तें होवो. समुद्रांत बुडी मारतांना, जर तुम्ही असा विचार करीत बसाल कीं, "न जाणों, इकडे एखादा खडक तर नसेल ना, तिकडे एखादी कपरी तर नसेल ना?" तर तुम्हांला कधींच बुडी मारतां येणार नाहीं.

**"परंतु समुद्र डोळ्याला दिसतो म्हणून त्यांत सरळ उडी मारणें शक्य असतें. पण आध्यात्मिक जीवनांत कशी उडी घेतां येईल?"**

जसा तुम्हांला उडी मारण्यापूर्वी समुद्र दिसायला पाहिजे आणि समुद्राची कांहीं थोडी माहिती असायला पाहिजे, त्याप्रमाणें अर्थातच तुम्हांला दिव्य जीवनाचें कांहींसें ओझरतें दर्शन तरी झालेलें असलें पाहिजे. हें ओझरतें दर्शन साधारणतः आंतरात्म्याची जागृति या रूपानें होत असतें. पण तें झालें नसलें, तरी कोणत्यातरी प्रकारचा साक्षात् अनुभव तुम्हांला आलेला असलाच पाहिजे; अंतरीं खोल आत्म्याला किंवा संपूर्ण जीवनाला भगवंताचा संस्पर्श झाला नसला, तरी निदान मनाला किंवा भावनांना तरी प्रबल असा संस्पर्श झालेला पाहिजे, अंतरीं अथवा आवतींभोंवतीं भगवंताच्या सान्निध्याचा स्पष्ट अनुभव आलेला असला पाहिजे; दिव्य जगतांतील वायुलहरींमधील श्वासोच्छ्वास कसा असतो, याचा थोडासा तरी अनुभव तुम्हांला आलेला असला पाहिजे. उलट, सर्वसामान्य जगाच्या वातावरणांत जीव कसा कासावीस होऊन जातो आणि कोंडमारा करणाऱ्या त्या वातवरणामुळेंच त्याच्यांतून बाहेर पडण्याच्या प्रयत्नास तुम्हीं कसें लागतां, हाहि अनुभव तुम्हांला आलेला असला पाहिजे. तसें असेल, तर आतां केवळ एकच गोष्ट करावयाची—कांहींहि मागें न राखतां सद्वस्तूचा आसरा मिळविण्याचा प्रयत्न करावयाचा, भगवंताचें साह्य नि संरक्षण यांच्या आधारानें जीवन जगावयाचें,—केवळ तेंच, दुसरें कांहींहि नाहीं. सर्वसामान्य जीवनांत जें कांहीं तुम्ही केवळ अंशतः केलेलें असेल अथवा जें कधींकधीं प्रसंगोपात् केलेलें असेल, तें आतां पूर्णपणें आणि कायमचें करून टाकलें पाहिजे. आध्यात्मिक जीवनांत जी उडी घ्यावयाची म्हटलें, ती ही अशी उडी जर घेतां आली नाहीं, तर वर्षानुवर्षें योग करून देखील, खऱ्या आध्यात्मिक जीवनाचें मर्म लवमात्रहि अनुभवतां येणार नाहीं. पूर्णपणें आणि सर्वांगांनीं आध्यात्मिक जीवनांत उडी घ्याल, तर आवतींभोंवतींच्या जीवनजंजालांतून तुमची सुटका होईल आणि आध्यात्मिक जीवनाची खरी अनुभूति तुम्हांला प्राप्त होईल.

**असें म्हणतात कीं, जर योगमार्गावर प्रगति करावयाची असेल, तर स्वतःच्या जीवनांतील प्रत्येक बाब, स्वतःची प्रत्येक क्षुल्लक वस्तुदेखील भगवंताला समर्पण करून टाकली पाहिजे. त्याचा निश्चित अर्थ काय?"**

योग म्हणजे भगवंताशीं संयोग आणि हा संयोग समर्पणानें साध्य होतो—तुमचें भगवंतास समर्पण, ही पायाभूत गोष्ट आहे. सुरुवातीस हें समर्पण सर्वसाधारण स्वरूपाचें असतें, पण जणुं काय आतां यांत बदल करावयाचा नाहीं अशा बुद्धीनेंच तें केलेलें असतें. तुम्ही म्हणतां : "मी भगवंताचा सेवक आहे, माझें जीवन मी सर्वस्वीं भगवंतास अर्पण करून टाकलें

आहे. दिव्य जीवनाचा साक्षात्कार करून घेण्यासाठीं माझे सारे प्रयत्न आहेत." तथापि हें केवळ पहिलें पाऊल असतें, कारण एवढें केल्यानें पुरेसें होत नाहीं. निश्चय करून झाल्यानंतर, तुमचें संपूर्ण जीवन भगवंताला अर्पण करून टाकावयाचें असें तुम्हीं ठरविल्यावरहि, तुम्हीं हें प्रतिक्षणीं लक्षांत ठेवलें पाहिजे आणि तुमच्या जीवनाच्या साऱ्या लहानसहान गोष्टींमधूनहि तें आचरणांत आणलें पाहिजे. पदोपदीं तुम्हांला असें वाटलें पाहिजे कीं, आपण आतां भगवंताचें आहोंत. तुमचे जे विचार चालतात किंवा तुम्ही जीं कामें करतां, त्या सर्वांतून तुम्हांला सतत असा अनुभव यावयास हवा कीं, माझ्यामधून दिव्य भागवत चेतनाच कार्य करीत आहे; माझें स्वतःचें असें आतां कांहींच राहिलें नाहीं; त्यामुळें प्रत्येक गोष्ट भगवंताकडून येत आहे आणि प्रत्येक गोष्ट परत भगवंतासच समर्पण करून टाकावयाची असते अशी तुमची भावना होऊं लागते. हें जेव्हां तुमच्या प्रत्यक्ष अनुभवांत उतरतें, तेव्हां, ज्या अगदीं लहानशा गोष्टीकडे तुम्ही एरवीं साधारणपणें विशेष लक्ष देत नाहीं किंवा तीबद्दल तुम्हांला विशेष आस्था वाटत नाहीं, ती गोष्ट सुद्धां आतां यापुढें क्षुल्लक आणि निरर्थक वाटत नाहीं; अशी प्रत्येक बाब आतां अर्थपूर्ण होऊन जाते आणि तीमुळें तुमच्यापुढें एक नवीनच विस्तीर्ण क्षितिज दिसूं लागतें.

आतां, मूळचें सर्वसाधारण समर्पण, जीवनांतील बारीक सारीक गोष्टींपर्यंत कसें नेऊन पोहोंचवावयाचें तें पहा. भगवंताच्या सान्निध्यांत सतत रहा. अशा भावनेंत रहा कीं, तुमचें चलनवलन आणि तुम्ही करतां ती प्रत्येक गोष्ट भगवच्छक्तीच घडवून आणत आहे. तुमच्या साऱ्या क्रियाप्रतिक्रिया त्या शक्तीस समर्पण करा—केवळ प्रत्येक मानसिक क्रिया, प्रत्येक विचार आणि भावनाच नव्हे, तर अगदीं सामान्य, बाह्य, अन्नसेवनासारख्या शारीरिक क्रिया देखील समर्पण करा. तुम्ही जेव्हां अन्न सेवन करतां, तेव्हां तुमच्याद्वारां प्रत्यक्ष भगवंतच अन्न भक्षण करीत आहे, असें तुम्हांस वाटलें पाहिजे. अशारीतीनें जीवनांतील साऱ्या प्रवृत्ती एका अखंड दिव्य जीवनांत तुम्हांस समाविष्ट करतां आल्या म्हणजे मग तुमच्या जीवनांतील भेदभावना लोपून जाऊन, त्याची जागा अखंड एकत्व घेईल. तुमच्या स्वभावाचें एक अंग फक्त भगवंतास सर्मपित केलें आहे पण इतर अंगें मात्र अगदीं सामान्य गोष्टी सामान्यरीतीनें करण्यांत गुंतलेलीं आहेत, असें पुढें कधींच प्रत्ययास येणार नाहीं; तुमचें समग्र जीवन भगवंतानें हातीं घेतलेलें असेल, तुमच्या ठिकाणीं क्रमशः सर्वांगीण परिवर्तन घडून येत राहील.

पूर्णयोगांत जीवनांतील अगदीं बारीकसारीक गोष्टींसकट समग्र जीवनाचें परिवर्तन करावयाचें असतें, त्यास दिव्य रूप द्यावयाचें असतें. म्हणूनच या योगांत कोणतीच गोष्ट क्षुल्लक नाहीं, कांहींहि कमी प्रतीचें नाहीं. तुम्हांला असें म्हणून चालणार नाहीं कीं, "जेव्हां मी ध्यान करीत असेन, तत्त्वज्ञानावरील ग्रंथ वाचीत असेन किंवा हीं प्रवचनें ऐकत असेन, तेव्हां माझें हृदय दिव्य ज्योतीच्या प्रभावास खुलें राहील, तेव्हां मी दिव्य प्रकाशास आवाहन करण्याच्या स्थितींत असेन; पण मी जेव्हां बाहेर फिरावयास जाईन, किंवा मित्रांच्या भेटीगांठी घेईन, तेव्हां हें सारें विसरलें तरी चालेल." याच भूमिकेला चिकटून रहाण्याचा प्रयत्न होत गेल्यास, तुम्ही जसेच्या तसेच रहाल, तुमचें परिवर्तन होणार नाहीं आणि भगवच्छक्तीशीं खरा संयोग कधींच घडून येणार नाहीं. तुमची जाणीव सदासर्वदा विभागलेली राहील; फारतर तुम्हांला या महान् जीवनाचीं केवळ ओझरतीं दर्शनें होऊन जातील. कारण ध्यानावस्थेंत

किंवा तुमच्या अंतर्गत जाणीवेमध्यें कांहीं अनुभूती आणि साक्षात्कार तुम्हांला झाले, तरी तुमचें शरीर व बाह्य जीवन न बदलतां पूर्ववत्च चालूं राहील. शरीर व बाह्य जीवन यांकडे दुर्लक्ष करणारें आंतरिक ज्ञान, आंतरिक प्रकाश विशेष महत्त्वाचा नाहीं. कारण त्यायोगें जग तर जसेंच्या तसेंच रहातें. आजपर्यंत सतत असेंच घडत आलेलें आहे. ज्या लोकांना फार मोठा आणि प्रभावी साक्षात्कार झालेला होता, त्यांनीं सुद्धां, आंतरिक स्थिरता नि शांतीमध्यें सुखेनैव, अविचल रहातां यावें म्हणून जगाकडे पाठ फिरविली. जगाचे सारे व्यवहार जगाच्याच रीतींनीं चालत राहिले; दुःख आणि मूर्खपणा, मृत्यू आणि अज्ञान यांचें साम्राज्य जीवनाच्या भौतिक पातळीवर होतें तसेंच चालूं राहिलें. जे कोणी जगापासून अशा-प्रकारें पराङ्मुख होतात, त्यांना, जीवनांतील गोंगाट अन् गोंधळ यांपासून पळ काढणें, अड-चणींतून काढतां पाय घेणें आणि इतरत्र कुठें तरी सुखनिधान प्राप्त करून घेणें ही घटना मोठी सुखकर असेल; पण अशावेळीं ते जग आणि जीवन मात्र दुरुस्त न करतां आणि न सुधारतां तसेंच राहूं देतात; एवढेंच नव्हे तर, त्यांच्या स्वतःची बाह्य जाणीवहि ते न बदलतां तशीच राहूं देतात आणि त्यांचें शरीर सुद्धां पूर्ववत् असंस्कारित अशा जड अवस्थेंतच राहिलेलें असतें. पुनः भौतिक जीवनांत प्रवेश केल्यानंतर सामान्य जनांच्यापेक्षांहि त्यांचें जीवन वाईट ठरण्याचा संभव असतोः कारण भौतिक जीवनांतील वस्तूंवर असलेलें प्रभुत्व ते गमावून बसलेले असतात आणि त्यामुळें त्यांचा भौतिक जीवनांतील व्यवहार गबाळेपणाचा होण्याचा, त्यांच्या जीवनक्रिया असहाय्यपणें चालण्याचा आणि ते कोणत्याहि शक्तीच्या आहारीं जाण्याचा संभव असतो.

ज्यांना अशा प्रकारचें ध्येय पाहिजे असेल, त्यांना तें ठीक आहे, पण आपला मात्र तो योगमार्ग नाहीं. कारण आपल्याला या जगावर आणि जगतील साऱ्या व्यवहारांवर भग-वंताचें अधिराज्य हवें आहे, भगवंताची सत्ता प्रस्थापित करावयाची आहे; आणि येथें या भौतिक जगांत दिव्यत्वाचा साक्षात्कार घडून यायला पाहिजे आहे. पण भगवंताचें आधिपत्य जर येथें प्रस्थापित व्हावयास हवें असेल, तर जें जें कांहीं आपल्याजवळ आहे, जें कांहीं आपण आहोंत आणि जें कांहीं आपण येथें करतों, तें सर्व आपण भगवंताला अर्पण करून टाकलें पाहिजे. म्हणून अमुक एक गोष्ट महत्त्वाची नाहीं किंवा बाह्य जीवन आणि त्याच्या गरजा या, दिव्य जीवनाचे अंगभूत भाग नाहींत असा विचार करून चालणार नाहीं. आपण जर असें करूं, तर आपण जेथें आहोंत, तेथेंच नेहमीं राहूं आणि बाह्य जीवनावर, बाह्य जगतावर कधींच विजय मिळवितां येणार नाहीं, स्थायी स्वरूपाचें असें कांहींहि करून होणार नाहीं.

**"ज्यांनीं बरीच आध्यात्मिक प्रगति केलेली आहे, ते परत ऐहिक पातळीवर येतात काय?"**

होय ऐहिक पातळीमध्यें बदल घडवून आणण्याची त्यांची इच्छा असेल, तर अधिक प्रगत झालेले लोक परत येण्याची अधिक खात्री. पण या जगापासून दूर पळ काढण्याचा ज्यांचा संकल्प असेल, त्यांच्या बाबतींत देखील, पैलतीरावर पोहोंचल्यावर त्यांच्या हें ध्यानांत येण्याचा संभव आहे कीं, जीवनापासून एवढी प्रयत्नपूर्वक मारलेली धांव, तितकीशी कांहीं फलदायी नाहीं.

**"या जीवनांतून एकदां आपण गेलों होतो आणि आतां पुनः हें जीवन जगत आहोंत अशी आठवण अनेकांना असते काय?"**

(अपूर्ण)

—श्रीमाताजी

# थोर पुरुष आणि अवतारी व्यक्ती

(श्री अरविंदांचीं पत्रें)

### श्रेष्ठत्व

'श्रेष्ठत्व' म्हणजे कोणत्या ना कोणत्या प्रकारचें असामान्य सामर्थ्य.

२४.४.३६.

★

थोर व्यक्तींची अवगणना करणें ही चूक होय. थोर व्यक्ती ह्या थोर नव्हत्या असें दाखवून देण्याचा यत्न लोक करूं लागले आहेत. ती एक अति मोठी चूक आहे. जगांत जर लोकांनीं थोरपणाचें गुणगान केलें नाहीं, तर जग क्षुद्र, मर्यादित, नीरस, संकुचित आणि तमोगुणप्रधान होईल.

★

### योगांतील श्रेष्ठत्व व विश्वरचनेंतील थोरवी

वर वर दिसून येणारें बाह्य श्रेष्ठत्व हें योगाचें ध्येय नव्हें हें उघड आहे. तथापि या कारणास्तव विश्वरचनेंतील थोरपणाचें कार्य ओळखूं नये किंवा थोर कार्यकर्ते, थोर कवी व कलावंत इत्यादींना त्यांचें योग्य स्थान देऊं नये असें मुळींच नाहीं.

★

### थोर व्यक्ति आणि विश्वरचनेमागील उद्दिष्ट

थोर पुरुषांचें जें सामर्थ्य असतें, तें थोर असतें. तें सामर्थ्य भगवंतापासून आलेलें असतें– आपल्या कृतींनीं आणि थोरवींनीं ते जगास साह्यभूत होतात आणि विश्वाच्या उद्दिष्टास मदत करतात.

त्यांच्या ठिकाणीं अहंकार आहे कां नाहीं, ही महत्त्वाची बाब नाहीं—कारण ते योग-मार्ग अनुसरत नसतात.

★

### परमेश्वर आणि बाह्य मोठेपण.

बाह्य मोठेपणाची तमा परमेश्वरानें कां बाळगूं नये ? विश्वांत जें जें आहे, त्या त्या सर्वांबद्दलची परमेश्वर काळजी वहात आहे. सर्व प्रकारचें श्रेष्ठत्व म्हणजे भगवंताचें विभूति-मत्त्व असें गीतेंत म्हटलें आहे.

१५.४.३६

★

### उत्साहशक्ति आणि सामर्थ्य यांचें भगवंतास महत्त्व

अति थोर व्यक्तीच केवळ, भगवंतास महत्त्वाच्या वाटतात असें नव्हे. सर्व प्रकारची उत्साहशक्ति, तीव्र सामर्थ्य, घटना घडवून आणणारी कार्यक्षम शक्ति हें सारेंच महत्त्वाचें आहे.

*

### थोरांचे दोष आणि दैवी कार्यांत त्यांचें साह्य

देवाच्या कार्यांत कशाचें साह्य होईल आणि कशाचें व्हावयाचें नाहीं, या संबंधींचा निर्णय तुम्हांला करतां येईल काय? या बाबतींतील तुमच्या कल्पना फारच प्राथमिक स्वरूपाच्या दिसतात.

दिव्यत्वाची तुमची कल्पना काय आहे? दिव्यत्व म्हणजे सद्‌गुणी मनुष्य होणें, चांगला पति, सुपुत्र, चांगला पिता, सज्जन नागरिक होणें असें कां तुम्हांला वाटतें? या दृष्टीनें पाहिल्यास माझ्या ठिकाणीं अदिव्यताच दिसून येईल; कारण असा मी कधींच नव्हतों. तसें असेल तर 'क्ष' किंवा 'य' यासारखीं माणसें दिव्यतेंत रूपांतर झालेलीं माणसें ठरावयाचीं.

पण नेपोलियन, सीझर, शेक्सपियर यांच्यासारखीं माणसें हीं मोठीं माणसें नव्हती आणि जगाकरितां किंवा विश्वहेतूच्या सिद्धयर्थ त्यांनीं कांहींच केलें नाहीं, अशी तुझी खरोखरीची समजूत आहे काय? त्यांच्या स्वभावांत दोष होते, दुर्गुण होते म्हणून स्वतःच्या हेतूच्या सिद्धीसाठीं देवाला त्यांचा उपयोग करून घेतां आला नाहीं, असें कां तुला वाटतें? किती अविचारी समजूत !

*

### परमेश्वर आणि श्रेष्ठ व्यक्तींचे दुर्गुण

थोर पुरुषांच्या अंगीं असलेल्या दुर्गुणांची तमा भगवंतानें काय म्हणून बाळगावी? परमेश्वर म्हणज काय पोलीस आहे? व्यक्तीचा सर्वसाधारण स्वभाव, प्रकृति जोपर्यंत कायम असते, तोंपर्यंत व्यक्तींच्या अंगीं सामर्थ्य आणि दोष, सद्‌गुण आणि दुर्गुण आढळणारच. जव्हां मनुष्य सामान्य प्रकृति ओलांडून तिच्या पलीकडे जातो, तेव्हां सद्‌गुण आणि दुर्गुण राहत नाहींत--कारण दिव्य प्रकृतींत या गोष्टींना स्थान नाहीं.

*

### दुर्गुण व सद्‌गुण; अन्धार व प्रकाश

दुर्गुण व सद्‌गुण यांचा अन्धार किंवा प्रकाश, (अज्ञान व ज्ञान) सत्य आणि असत्य यांच्याशीं कांहीं एक संबंध नाहीं. आध्यात्मिक जीवन जगणारा मनुष्य सद्‌गुण व दुर्गुण यांच्या पलीकडे जातो, पण सत्य आणि प्रकाश यांच्या पलीकडे जात नाहीं, जर 'सत्य' आणि 'प्रकाश' यांचा अर्थ 'मानवी सत्य' आणि 'मानसिक प्रकाश' असा असेल तर गोष्ट वेगळी. दुर्गुण व सद्‌गुण यांच्या पलीकडे जाणें जसें आवश्यक आहे, तसेंच याहि मानवी सत्याच्या आणि प्रकाशाच्या पलीकडे गेलें पाहिजे.

*

## दुर्गुण

'दुर्गुण' म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून, बांध मोडून हव्या त्या मार्गानें अलोट शक्तीचें केवळ वाहाणें.

★

## थोरांचे दुर्गुण

थोरांच्या ठिकाणीं मानसिक, शारीरिक, प्राणिक सर्वप्रकारचा असीम उत्साह असतो; ज्याला 'दुर्गुण' म्हणून संबोधतात, त्यांच्याद्वारां हा उत्साह जसा प्रकट होतो, तसाच 'सद्-गुणां'च्याहि द्वारां प्रकट होतो.

★

ज्यांच्या शक्ती मोठ्या असतात, ज्यांचें मन आणि प्राण दोन्हीहि भाग शक्तियुक्त असतात, त्यांच्या चारित्र्यांत पुष्कळदां सर्वसाधारण लोकांच्यापेक्षांहि ठळक ठळक दोष दिसून येतात; किंवा निदान असें म्हणणें बरें दिसेल कीं, सामान्य लोकांचे दोष सामान्य लोकांच्या सारखेच लहान असल्यानें तितकेसे नजरेंत भरत नाहींत.

★

होय, आपण म्हणतां ते बरोबर आहे. अनेक थोर व्यक्तींच्या अंगीं पुष्कळदां मोठे मोठे आणि अनेक दोष आढळन येतात. थोर व्यक्तींचें चारित्र्य नेहमींच कित्ता घालून देण्या-सारखें असतें असें नाहीं.

★

## सद्गुण आणि थोरपण

नेपोलियन, सीझर, आणि शेक्सपियर यांच्याविषयीं बोलावयाचें झालें, तर त्यांच्यापैकीं एकहि सद्गुणसंपन्न नव्हता, पण ते थोर होऊन गेले. फक्त सद्गुणी माणसेंच मोठीं असतात आणि दुर्गुणी माणसांचे अंगीं मोठेपण असत आहीं हें तुझें म्हणणें असमंजसपणाचें आहे, विचारास न पटण्याजोगें आहे. वर सांगितलेले तिघेहि स्त्रीलंपट होते. त्यांपैकीं दोघे महत्त्वा-कांक्षी होते. नेपोलियन हा अति उर्मट आणि बेफिकीर होता.

★

तूं असें कसें म्हणतोस ? शेक्सपियर, नेपोलियन आणि सीझर यांना स्वतःच्या थोरपणाची चांगलीच जाणीव व कल्पना होती.

शेक्सपियरनें चौर्यकर्म केलें होतें, नेपोलियनचें वर्तन स्वैरपणाचें होतें. पापपुण्याची किंवा इष्टानिष्टतेची शंकाहि कधीं सीझरच्या मनाला स्पर्शून गेली नाहीं.

★

बहुतेक थोर व्यक्तींना, आपण थोर आहोंत ह्याची चांगली पूर्ण जाणीव असते.

★

### महत्त्वाकांक्षा

त्या त्या क्षेत्रांतील महत्त्वाकांक्षा ही मोठी, डोळे दिपवणारी असो किंवा लहान असो; महत्त्वाकांक्षा ती महत्त्वाकांक्षाच; आणि उत्साहपूर्वक कांहीं प्रचंड कार्य करण्याकरितां ती आवश्यकहि असते. क्षुल्लक वस्तूला दुर्गुण म्हणावयाचें आणि मोठ्या वस्तूचें स्तोम माजवावयाचें यांत काय प्रयोजन ?

★

### दिमाख

मोठ्या प्रमाणावर असलेल्या दिमाखाची, वृथाभिमानाची सर्वसाधारण तऱ्हा अशीच असते. अशा मनुष्याला आपल्या प्रत्येक कर्मांत उत्साह वाटत असतो आणि हा उत्साह म्हणजे संपादन केलेली एक विशेष गोष्ट, असा त्याचा गैरसमज असतो. ही चूक सर्वत्र आढळते. कांहीं विशेष संपादित केलेलें असलेंच, तर तें एकाद्या दुसऱ्या क्षेत्रांत असतें.

★

### अवतार व विभूति

सामान्यपणें बोलावयाचें, तर स्वतःचे ठिकाणीं भगवंताचें सान्निध्य वा शक्ति जन्मतःच निर्माण झाल्याचें किंवा स्वतःमध्यें ती अवतीर्ण झाल्याचें आणि आंतून आपल्या संकल्पशक्तीवर, जीवनावर आणि सर्व कृतींवर भगवंतच हुकमत चालवीत असल्याचें ज्याला भान असतें, त्याला 'अवतार' म्हणतां येईल. भगवंताच्या या शक्तीशीं व अस्तित्वाशीं आपण आंतून एकरूप झालेलों आहों, अशी अनुभूति त्याला येत असते.

भगवंताचा कांहीं एक शक्तिविशेष ज्याच्या ठिकाणीं वास करीत असतो आणि त्यायोगें ज्याला जगांत समर्थपणें मोठें कार्य करतां येतें, त्या व्यक्तीस 'विभूति' मानतात. विभूति म्हणजे इतकेंच. विभूतीच्या ठिकाणची शक्ति अति मोठी असूं शकेल; पण अंतरीं जन्मतःच भगवंताचें वास्तव्य असल्याची, भगवत्सान्निध्याची, जाणीव व अनुभूति विभूतींत नसते. गीतेवरून येवढाच फरक स्पष्ट होतो आणि या विषयांत गीता हाच मुख्य प्रमाणभूत ग्रंथ आहे. अवतार व विभूति यांमधील हा भेद जर मान्य केला, तर राम व कृष्ण यांच्या वर्णनावरून ते अवतार होते हें निःशंकपणें मान्य करतां येईल. बुद्ध हाहि अवतार मानतात; मात्र त्याला त्याच्या अंतरींच्या शक्तीचें भान, निर्गुण निराकार अशा स्वरूपांत अधिक होतें आपल्या ठिकाणीं राम कोण व कृष्ण कोण असें जेव्हां रामकृष्ण परमहंस म्हणतात, त्यावेळीं तेंच भान व्यक्त होतें. परंतु चैतन्यांचें उदाहरण मात्र विशेष वेगळें आहे. जी माहिती आहे. तीवरून सामान्यपणें त्यांना असें वाटे आणि ते असें म्हणत कीं, आपण कृष्णमय आहोंत, अधिक कांहीं नाहीं; पण कांहीं महत्त्वाच्या प्रसंगीं त्यांच्यामधून 'कृष्ण' प्रकट होत असे, त्यांचें मन तेजानें युक्त होई, देह तेजःपुंज दिसे. अशावेळीं ते कृष्णच असत; बोलत आणि वर्ततहि कृष्णाप्रमाणेंच. त्यांच्या समकालीनांनीं त्यांना कृष्णावतार, म्हणजे दिव्यप्रेमाचा आविष्कार मानिलें.

श्रीशंकराचार्य आणि विवेकानंद या, निःसंशय विभूती होत्या. विभूति या नात्यानें त्यांचें महत्त्व जरी फार मोठें असलें, तरी त्यांना विभूतीहून अधिक कांहीं मानतां येणार नाहीं.

★

### श्रीरामकृष्ण

रामकृष्णांनीं आत्मवृत्त कधींच लिहिलें नाहीं—त्यांच्या शिष्यांशीं आणि इतरांशीं त्यांचे जे संवाद होत, तेंच त्यांचें म्हणणें. ख्रिस्त किंवा चैतन्य यांना अवतार म्हणून जेवढी मान्यता आहे, तेवढी मान्यता निश्चितच रामकृष्णांना द्यावयास हवी.

★

### अवताराचे मानवी गुण

तें सर्व चूक आहे. देह व त्याचे अवयव हें साधन म्हणून स्वीकारून, मानवी स्वभावाचाहि स्वीकार अवतार करतो. तरीपण या साधनाच्या मागें कार्यकारी असलेली जाणीव मात्र दिव्य असते.

★

अवताराच्या ठिकाणीं जरी दिव्यचेतना कार्यकारी असली, तरी त्यामुळें माणसें वागतात त्याप्रमाणें वागण्यास आणि स्वतःच्या जीवनार्थ व कार्यार्थ प्रकृतीच्या क्रिया-प्रतिक्रियांचा उपयोग करण्यास कसलाहि प्रतिबंध येण्याचें कारण नाहीं.

★

### अवतार व साधुत्व

. . . . अवतारी व्यक्ती विवाहबद्ध होऊं शकतात, त्यांना संतति होते आणि हें तर कामलालसेवांचून शक्य नाहीं. अवतारी व्यक्तींना शत्रू, मित्र, कौटुंबिक भावना असूं शकतात. . . . . हें सारे प्राणिक व्यवहार आहेत. मला वाटतें, अवतार म्हणजे साधु अथवा योगी असलाच पाहिजे, अशी तुझी समजूत दिसते.

★

### दिव्यशक्तीच्या प्रकटीकरणाचा मार्ग

पृथ्वीगत चेतनेच्या दृष्टीनें, भगवान् स्वतः प्रकट होतो ही घटनाच मुळीं सर्वांत मोठी दिव्य अशी घटना आहे हें खचित. या जगांतील या अंधकारमय अज्ञानाचा विचार करा आणि जर कां भगवत्‌शक्ति प्रत्यक्ष प्रकट न होती आणि गाढ अंधःकारांतून श्रेष्ठ दिव्य ज्योति जर प्रकाशित न होती, तर काय झालें असतें याचा विचार करा. भगवंताचें प्रकटीकरण होणें म्हणजे हें.

—श्रीअरविन्द

# कामविकार—आहार—निद्रा

**प्रश्न**:—योगमार्गांत कामवासना हा सर्वांत मोठा अडथळा आहे हें खरें नव्हे काय ?

**उत्तर**:—सर्वांत मोठ्या अडथळ्यांपैकीं निदान एक तरी आहे.

**प्रश्न**:—अधिक अन्न सेवन केल्यानें कामवासना बलवत्तर होते आणि तें प्रमाण कमी केल्यानें कामवासना कमजोर होते हें खरें काय ?

**उत्तर**:—असें नसून कांहीं प्रकारच्या पदार्थांचें सेवन केल्यानें ती वासना बलवत्तर होतें असें समजतात—उदा. मांस, कांदा, मिरची इ०

**प्रश्न**:—लोभ, क्रोध, मत्सर इत्यादि दोष कामवासनेचे सहकारी होत काय ?

**उत्तर**:—सर्वसाधारणपणें अशा दोषांचें कामवासनेशीं साहचर्य असतें; मात्र नित्य नव्हे.

**प्रश्न**:—श्रीमाताजींनी असें म्हटलें आहे कीं, "कामवासनेसारख्या इतर प्रेरणांचें बळ जर कशांत असेल, तर लोकांनीं त्याकडे अतिरेकी लक्ष देण्यांत"—अशा प्रेरणांकडे विशेष लक्ष देणें म्हणजे काय ?

**उत्तर**:—एकाद्या व्यक्तीनें सतत त्यासंबंधींचा विचार करणें आणि त्यांच्याशीं सतत झगडत रहाणें म्हणजे त्यांकडे अतिरेकी लक्ष पुरविणें.

**प्रश्न**:—अशातऱ्हेनें जर त्या वासनांकडे अतिरेकी लक्ष द्यावयाचें नसेल, तर साधकानें काय करावयास हवें ?

**उत्तर**:—त्यानें त्यापासून अलिप्त व्हावें, कामवासनेचा विचार कमी करावा आणि भगवंताचें चिंतन अधिकाधिक करीत रहावें.

**प्रश्न**:—कामवासनाविषयक विचारांसंबंधीं श्रीमाताजींनीं असेंहि म्हटलें आहे कीं, "जुलुम-जबरदस्ती करून त्या ताब्यांत ठेवण्याचा, त्या आंतल्या आंत आंवरून धरण्याचा आणि दाबून टाकण्याचा प्रयत्न करणें" हें अयोग्य आहे. असे विचार व्यक्ति आंतल्या आंत कसें आंवरून धरते, त्यांना दडपून कसें टाकते ?

**उत्तर**:—त्यांच्या त्या शब्दांतच याचें स्पष्टीकरण आहे. कामवासनाविषयक विचार तुमच्या ठिकाणीं थैमान घालत असतील आणि कोणत्याहि प्रकारच्या कृतींतून तुम्ही ते व्यक्त होऊं देत नसाल, तर तुम्हीं ते आंतल्या आंत आंवरून धरलेत आणि दडपून टाकलेत असें म्हणावयाचें. क्रोध अथवा इतर कोणत्याहि मनोविकारासंबधींहि असेंच समजावयाचें. ते मनो-विकार फेंकून द्यावयाचे असतात, जवळ बाळगावयाचे नसतात.

**प्रश्न**:–स्वभावांतील अयोग्य क्रिया-प्रतिक्रियांवर संयम घालणें म्हणजे त्या केवळ दडपून टाकण्यासारखें आहे आणि त्या संपूर्णपणें काढून टाकावयाच्या असतील, तर त्यांचा त्याग केला पाहिजे असें आपण म्हटलें. तरमग कामवासना, क्रोध, भीति इत्यादींना आवर घालण्याचा उपयोग काय ?

**उत्तर**:–जर त्यांचा यशस्वीरीत्या त्याग करतां आला नाहीं, तर संयम आवश्यक असतो. अशा संयमामुळें प्राणिक प्रेरणांचें गुलाम होण्याचें तरी निदान टळतें. एकदां संयम करण्याचें साधलें म्हणजे मग यशस्वीरीतीनें त्यांचा त्याग करणें अधिक सुकर होतें. संयमाच्या अभावीं यशस्वीरीत्या त्याग करणें जमत नाहीं.

**प्रश्न**:–कामशक्तीचें 'ओजस्' मध्यें रूपांतर करण्याची पद्धति कोणती ?

**उत्तर**:–एकादी पद्धतीच अनुसरावयाची असेल, तर तपस्येच्या पद्धतीनें, म्हणजे मन, उच्चार आणि आचार याबाबतींत आत्मसंयमपूर्वक आचरण करून आणि संकल्पाच्या द्वारां 'रेतस्' ची शक्ति वर खेंचून. पण याहिपेक्षां आधिक चांगल्या रीतीनें ही गोष्ट साध्य करतां येते. योगमार्गांतील इतर साऱ्या गोष्टींच्या प्रमाणें याहि बाबतींत दिव्य शक्तीचें अवतरण झाल्यानें, कामवासनेच्या केंद्रावर दिव्य शक्तीच्या कार्याचा परिणाम घडून येऊन आणि शेवटीं रूपांतर होऊन हें साध्य होतें.

**प्रश्न**:–उपासानें साधनेला साह्य होतें काय ?

**उत्तर**:–या योगास उपासानें साह्य होत नाहीं.

**प्रश्न**:–अगदीं थोडा आहार घेतल्यानें इंद्रियें ताब्यांत ठेवण्यास मदत होतें काय ?

**उत्तर**:–नाहीं. त्यायोगें फारतर त्यांना एक प्रकारचा चेव आल्यासारखें होतें. 'युक्ता-हार' हा उत्तम. जे उपास करतात, त्यांना सहजच, आपण कांहीं विशेष केल्यासारखें वाटूं लागतें आणि मग त्यांचा समतोलपणा सुटण्याचा संभव असतो.

**प्रश्न**:–केवळ शाकाहार घेतल्यानें इंद्रियांवर संयम घालण्यास मदत होते काय ?

**उत्तर**:–मांसाहारामुळें उत्पन्न होणाऱ्या अडचणींपैकीं कांहीं अडचणी शाकाहारानें टळतात पण इंद्रियसंयमनास केवळ शाकाहार पुरेसा नाहीं.

**प्रश्न**:–उच्चतर जाणीव प्राप्त झाल्यावर साधकाला झोंप आवश्यक असते काय ?

**उत्तर**:–शरीराच्या साऱ्या क्रियांमध्यें, हालचालींमध्यें रूपांतर झालेलें असें शरीर जोंवर नाहीं, तोंवर झोंपेची आवश्यकता आहे.

**प्रश्न**:–रात्रीं मन आणि प्राण इतके क्रियाशील कां दिसतात ? रात्रीं अनुभवास येणाऱ्या या त्यांच्या क्रियाशीलतेवर संयम कसा प्रस्थापित करावयाचा ?

**उत्तर** :—क्रियाशील रहाणें हें त्यांचें विशिष्ट असें कामच आहे. जोंवर झोंपेंत पूर्णपणें जागृत, जाणीवयुक्त रहातां येत नाहीं, तोंवर त्यांचें काम चालूंच रहाणार.

**प्रश्न** :–झोंपेच्या पहिल्या आणि मधल्या भागांत मानसिक आणि प्राणिक क्रियांना भर आलेला दिसतो, पण झोंपेच्या शेवटच्या भागांत ही क्रियाशीलता विराम पावते आणि मला विविध प्रकारचीं लाक्षणिक स्वप्नें पडतात आणि उच्चतर क्षेत्रांतून सूचना मिळतात. याला कारण काय ?

**उत्तर** :–बहुधा असें घडून येतें कीं, झोपेंत सामान्य भानामधून टप्प्याटप्प्यांनीं अधिक खोल, गाढ जाणीवेंत जाऊन, मनुष्य अखेरीस जवळ जवळ आंतरात्म्याशीं जाऊन पोंचतो आणि विश्रांति घेतो; किंवा उच्च उच्चतर जाणीवेंत जाऊन, निश्चलनीरवतेंत आणि शांतिमय स्थितींत विश्रांति घेतो. अशा विश्रांतींत घालविलेले थोडे क्षणहि नवा उत्साह प्राप्त करून देतात. ती झोंप जर मिळाली नाहीं, तर केवळ अर्धवट विश्रांति लाभते. खरी विश्रांति जेथें मिळू शकते, अशा या ज्या दोन स्थिती, त्यांपैकीं कोणत्याहि एकीच्या सन्निध आल्यावर साधकाला, तुम्ही म्हणतां तशीं उच्च प्रकारचीं स्वप्नें पडण्यास प्रारंभ होतो.

**प्रश्न** :–झोंपेंत आंतरात्म्याच्या सन्निध किंवा उच्चतर भानांत प्रवेश करून, तेथें विश्रांति घेण्याचा मार्ग कोणता ?

**उत्तर** :–आहे या स्थितींत तें अजाणतांच घडून येत असतें. जर तें जाणीवपूर्वक घडवून आणून, त्यावर ताबा मिळवावयाचा असेल, तर प्रथम, झोंपेंत भान राखतां आलें पाहिजे.

**प्रश्न** :–जड विस्मृतिपूर्ण झोंप भानयुक्त कशी करावयाची ?

**उत्तर** :–झोंपेंत अधिक अधिक भान यावें म्हणून आवाहन करून.

**प्रश्न** :–दिवसांच्या सुमारें अर्धातास झोंपेनेंहि जसा उत्साह वाटतो, तसा रात्रींच्या पांच सहा तास झोंपेनेंहि वाटत नाहीं, असें माझ्या लक्षांत आलें आहे. त्यास कारण काय ?

**उत्तर** :–दिवसां घेतलेली झोंप निराळ्या प्रकारची. ती रात्रींइतकी गाढ असत नाहीं. गाढ विस्मृतिपूर्ण अशा स्थितींत वेळहि कमी जातो. म्हणून तसा फरक.

**प्रश्न** :–कांहीं लोक म्हणतात कीं, त्यांना रात्रभर निःस्वप्न झोंप लागते. हें शक्य असतें काय ?

**उत्तर** :–त्यांच्या म्हणण्याचा आशय इतकाच कीं, झोपेंतून ते जेव्हां जागे होतात, तेव्हां त्यांना स्वप्नें पाहिल्याचें आठवत नाहीं. झोंपेंत आपली जाणीव निरनिराळ्या थरांत प्रविष्ट होते, तेथले तेथले अनुभव घेते आणि जेव्हां आपलें जड मन हे अनुभव सदोषपणें वा निर्दोषपणें रूपांतरित करतें, तेव्हां त्यास 'स्वप्न' म्हणतात. साऱ्या झोंपेंत स्वप्नें पडत असतातच; पण कधीं तीं आठवतात, कधीं तीं मुळींच आठवत नाहींत. आपल्या विस्मृतिपूर्ण भागांतहि–आपल्या अवचेतन भागांतहि (Subconscient)–आपली जाणीव कधीं कधीं खोलवर जाते आणि तेथेंहि स्वप्नें पडतातच. पण तीं स्वप्नें आपल्या अस्तित्वाच्या इतक्या खोलवरच्या थरावरचीं असतात कीं, झोंपेंतून जागृति आल्यावर स्वप्नें पाहिल्याची आठवणहि उरत नाहीं.

**प्रश्न** :–स्वप्नांना कांहीं अर्थ असतो काय ? विस्मृतियुक्त भागांत जीं स्वप्नें पडतात, त्यांना कांहीं अर्थ असतो काय ?

**उत्तर** :–आपल्या विस्मृतियुक्त भागापेक्षां दुसऱ्या भागांतील जेव्हां स्वप्न असतें, त्यावेळीं तें एकतर लाक्षणिक असतें अथवा मनाहून उच्च अशा पातळीवरील तो एक अनुभव असतो किंवा मानसिक, प्राणिक अथवा आणखी कोणत्या तरी शक्तीनें त्या पातळीवर घडविलेली ती एक रचना असते. क्वचित् प्रसंगीं ती एकाद्या भूतकालीन, वर्तमानकालीन किंवा भविष्य-कालीन प्रत्यक्ष वा संभाव्य प्रसंगाची सूचना ठरते. आपल्या विस्मृतिपूर्ण पातळीवर पडलेल्या स्वप्नाला कांहीं एक अर्थ नसतो. त्या विस्मृतिपूर्ण भागावर उमटलेल्या गतकालीन स्मृती नि संस्कार यांची ती एक खिचडी असते.

**प्रश्न** :–एक स्वप्न. "कांहीं लोक मोठ्या कष्टानें पर्वतावर चढून जात होते. मीहि त्यांच्या समवेत होतो. कांहीं काळानें मी दमून गेलों म्हणून मी चढण्याचें सोडून दिलें आणि आतां काय करायला हवें म्हणून विचार करूं लागलों. नंतर मला असें भासलें कीं, एका शक्तीनें अनायासें मला वर उचललें आणि त्या पर्वतशिखरावर नेऊन ठेवलें. शिखरावर पोहोंचल्यावर तेथें मला पुष्कळ विविध रंगांचीं आणि प्रकाशाचीं घरें दिसलीं. मी जागा झालों. हें स्वप्न काय ध्वनित करतें ?

**उत्तर** :–हें स्वप्न लाक्षणिक आहे. साधकाचा केवळ स्वप्रयत्न आणि श्रीमाताजींच्या शक्तीनें साधकाची घडून येणारी प्रगति या दोन पद्धतींचें तें सूचक आहे.

**प्रश्न** :–प्राणिक थरांवरील वाईट वाईट स्वप्नें मला वारंवार पडतात हें कसें थांबवा-वयाचें ?

**उत्तर** :–स्वप्नांत ज्या वाईट गोष्टी दिसतात, त्यांच्या विरुद्ध झोंपी जाण्यापूर्वीं जागे-पणींच निश्चयात्मक संकल्प करून तें शक्य होतें. यांत प्रथम एकदम यश दिसणार नाहीं पण अखेरीस दिसेल; नाहींतर झोंपेंत आधिकाधिक भान राखतां यावें अशी अभीप्सा करीत राहिलें पाहिजे.

**प्रश्न** :–कधीं कधीं स्वप्नांत माझ्यावर जेव्हां हल्ला होतो, त्यावेळीं श्रीमाताजींच्या नांवाचा पुनः पुनः उच्चार करून, त्यापासून मला माझी सुटका करून घेतां येते. श्रीमाताजींच्या नामोच्चारांतहि सामर्थ्य आहे असा त्याचा अर्थ काय ?

**उत्तर** :–होय, अगदीं खचित्. भगवत् शक्तीच्या नामांतहि सामर्थ्य नित्य सामावलेलें असतें .

—श्रीअरविन्द

(Elements of yoga वरून)

# स्वराज्य

(२३-२-१९०८ च्या 'वंदे मातरम्' मध्यें श्रीअरविंदांनीं लिहिलेला हा लेख आजहि मार्गदर्शक आहे.—संपादक)

पबना येथील परिषदेच्या प्रसंगीं आमच्या राष्ट्रवादांत, राष्ट्रीयतेंत एका नव्या वृत्तीची भर पडली. ही वृत्ति आजवर आम्हांला आमच्या राष्ट्रीयतेंत आढळून आलेली नाहीं. आमच्या ज्या सभा, परिषदा आजवर झाल्या, त्यांत ही वृत्ति नव्हती—ही वृत्ति म्हणजे, व्यावहारिकतेची, व्यावहारिक उपयोगाकडे लक्ष देण्याची वृत्ति होय. पबना परिषदेंत झालेले ठराव, उचललेलीं पाउलें या नव्या व्यावहारिकतेच्या वृत्तीची साक्ष देतात. आम्ही आजवर साध्यें आणि साधनें यांजविषयीं वाद घालण्यांत दंग होतों. आम्हांला आतां विश्वास वाटत आहे कीं, आमचा देश, निदान आमचा बंगाल आज अशा स्थितींत येऊन पोंचला आहे कीं, साध्य-साधनविषयक वाद यानंतर आम्हांला बिलकूल आवश्यक राहिलेला नाहीं. भिऊन किंवा मुत्सद्देगिरी म्हणून कोणी कांहीं म्हणो, ही गोष्ट निश्चित आहे कीं, आमचें सर्व राष्ट्र आज एकमताचें झालेलें आहे: स्वराज्य—कोणतीहि मर्यादा, कोणतीहि उणीव नसलेलें स्वराज्य—हें एकमेव साध्य बंगालचें अंतःकरण ओळखतें. पबना परिषदेचे अध्यक्षमहाशय देखील आपल्या दुसऱ्या (शेवटल्या) भाषणाचे वेळीं, वातावरणांत भरून राहिलेल्या महान् भावनेनें भारावून गेले होते. आपलें आरंभींचें भाषण करतेवेळीं अध्यक्षांनीं स्वतःच्या सावधपणाच्या वृत्तीला मान देऊन भाषण केलें होतें आणि त्यामुळें त्या भाषणांत, महत्त्वाकांक्षी साध्यांचा त्यांनीं पुरस्कार न करतां तिरस्कार केला होता—तथापि शेवटल्या भाषणाचे वेळीं आपली सावधपणाची वृत्ति नव्या वातावरणामुळें ते विसरून गेलें आणि मग त्यांच्या आनंदपूर्ण अंतःकरणांतून, श्रोत्यांना स्फुरण देणाऱ्या वक्तृत्वाचा प्रचंड ओघ एकदम बाहेर पडला आणि या वक्तृत्वानें श्रोतृसमाजाचीं अंतःकरणें तळमळीच्या उच्च आकांक्षांनीं हेलावून गेलीं. अध्यक्ष-महाशयांच्या, कविराजांच्या वक्तृत्वाचा विषय 'स्वराज्य' हा होता—आणि लक्ष लावून ऐकणाऱ्या कोणत्याहि श्रोत्याला ही गोष्ट सुस्पष्टपणें जाणवत होती कीं, कविराजांच्या अंतःकरणांत, कोणतीहि मर्यादा वा कोणतीहि न्यूनता नसलेलें स्वराज्यच राष्ट्राचें साध्य म्हणून सिंहासनाधिष्ठित झालेलें होतें. वसाहतीच्या स्वराज्याला मतें देणारे श्री. सुरेन्द्रनाथ आणि इतर मंडळी यांना ही गोष्ट अंतरंगांतून पटली आहे कीं, त्यांचें जें ध्येय आहे तें ध्येय राष्ट्राला मान्य नाहीं. हे लोक राष्ट्राला मान्य असलेल्या मताच्या प्रवाहांत उडी घेत नाहींत याचें कारण, त्यांची पुष्कळ दिवसांची संवय आणि त्यांना वाटत असलेली भीति हेंच आहे. या मंडळीखेरीज इतर जो श्रोतृसमाज होता, त्याच्या मनावर रवीन्द्रनाथांच्या मुखांतून प्रवाहित झालेल्या तळमळीच्या वक्तृत्वाचा फार परिणाम झाला हें उघड दिसत होतें. परिषदेंत कोणते ठराव मान्य झाले, कोणते अमान्य झाले ही गोष्ट महत्त्वाची नाहीं. महत्त्वाची गोष्ट आहे ती ही कीं, 'स्वराज्य' हा शब्द, केवळ शब्द राहिलेला नाहीं, 'स्वराज्य' हें ध्येय दूरचें आणि अशक्य ध्येय राहिलेलें नाहीं; बंगालच्या अंतःकरणानें हें ध्येय कवटाळलेलें आहे,

वंगालच्या बुद्धीनें या ध्येयाला मान्यता दिलेली आहे. आम्हीं कोणाचेंहि वकीलपत्र घेतलेलें नाहीं; पण श्रीयुत मनोरंजन गुह यांचे विशिष्ट बोल, दिव्यस्फूर्तीचे बोल होते, असें आम्हांला वाटतें, हे बोल म्हणजे त्यांनीं परिषदेला दिलेला इशारा होय : चळवळ कराल ती नेहमीं ईश्वराला दृष्टीसमोर ठेवून करा, चळवळ करतांना ईश्वर केव्हांहि दृष्टीआड होऊं देऊं नका असा इशारा श्रीयुत गुह यांनीं परिषदेला दिला. लोकांच्या अंतःकरणांत प्रबळ उच्च आकांक्षा उठाव करून आहेत; या आकांक्षांची उंची छाटून, त्या खुज्या करण्याचा प्रयत्न करणारा कोणीहि आपल्या स्वतःच्या अंतःस्फूर्तीशीं प्रतारणा करीत आहे असें म्हणावें लागेल. चळवळ करतांना तपशिलाच्या लहानांत लहान गोष्टींची व्यवहारदृष्टीनें छाननी आम्हीं करावी, हें ठीक आहे; पण कोणतेंहि तपशिलाचें काम स्वराज्याचा सिद्धीसाठीं आम्ही करीत आहों, 'त्या कामासाठीं तें काम' आम्हीं करीत नाहीं; तें काम आमचें साध्य नाहीं; स्वराज्य हें आमचें साध्य आहे हें आम्हीं केव्हांहि विसरतां कामां नये. कोणत्याहि तपशिलाच्या कामांत बुडून जाऊन, आम्ही आमचें ध्येय विसरलों, तर आम्हीं आमच्या अंतःस्फूर्त उच्च आकांक्षेशीं प्रतारणा केल्यासारखें होईल; एक मनुष्य समुद्र किनाऱ्यावर लहान लहान दगड मोठ्या उत्साहानें गोळा करीत होता; या उत्साहाच्या भरांत, त्याच्या हातीं आलेला, ईश्वरानें त्याच्या हातीं दिलेला किमयेचा दगड–परीस–त्यानें क्षणभर हाताळून दूर फेंकून दिला; त्या दुर्दैवी मनुष्यासारखी आम्ही आमची अवस्था करून घेऊं, जर स्वराज्य हें आमचें साध्य, तपशिलाच्या विवंचनेंत आम्ही विसरून जाऊं तर. स्वराज्य हा परीस आहे; आमच्या हातीं तो आला आहे. स्वराज्य या साध्याचा परीस ज्या ज्या गोष्टीला स्पर्श करील, ती ती गोष्ट सोनें होईल––स्वराज्यासाठीं ग्रामसमित्या स्थापन केल्या जातात म्हणून त्या चांगल्या, स्वराज्यासाठीं बहिष्कार वापरला जातो म्हणून तो चांगला, स्वराज्यासाठीं 'स्वदेशीचा' पुरस्कार, म्हणून तो चांगला; स्वराज्यासाठीं पंचायतीचा पुरस्कार, म्हणून तो चांगला–– एरव्हीं ग्रामसमिति, बहिष्कार, स्वदेशी, पंचायत या गोष्टी स्वतंत्रपणें विशेष महत्त्वाच्या आम्ही समजत नाहीं. स्वराज्य विसरून जाऊन या इतर सर्व गोष्टी आम्हीं सिद्ध केल्या, तर त्या साधकासारखी आमची स्थिति होईल, ज्या साधकाचा कमरपट्टा सोन्याचा झाला पण जो परिसाला नेहमींचा आंचवला.

गेल्या तीन वर्षांत ज्या गोष्टी आम्हीं केल्या, त्या केवळ स्वराज्याच्या आशेच्या बळावर आम्हीं करूं शकलों, हें आम्हीं केव्हांहि विसरतां कामां नये. या तीन वर्षांत आम्हीं जे महान् प्रयत्न केले, महान् त्याग केले, आमचा छळ होत असतां, जी अदम्य चिकाटी आम्हीं दाखविली, तिजमुळें आमच्या राष्ट्राचा प्रसूतिकाळ म्हणून हीं तीन वर्षें नित्य स्मरणार्ह झालीं आहेत––हें सर्व करावयाचें सामर्थ्य, स्वराज्याच्या आशेहून कमी प्रतीची आशा आम्हांला देऊं शकली नसती, स्वराज्याच्या भव्य ध्येयाहून कमी भव्यतेचें ध्येय देऊं शकलें नसतें. हीं तीन वर्षें आम्हीं जें सहन केलें, तें कोणत्याहि क्षुद्र हेतूसाठीं आम्हीं किंवा कोणींहि सहन केलें नसतें. ईश्वरानें ज्या गोष्टीचें दर्शन आम्हांला घडविलें, त्या गोष्टीला नकार देण्यानें आमचें कसलेंहि कल्याण होणार नाहीं; पीटरनें आपल्या गुरूच्या संबंधांत नकार दिला आणि त्यायोगें पीटरचें अर्धें पुण्य, अर्धें वीर्य त्याला सोडून गेलें. पीटर पश्चात्तापानें दग्ध होऊन, तीव्र दुःखावेगानें आंसूं ढाळीत राहिला. आमच्या लोकांना पीटरची

गति येऊं नये, स्वतःच्या मूर्खपणामुळें, स्वतःच्या हृदयांतून लोकांनीं ईश्वराला आणि ईश्वरदत्त ध्येयाला बाहेर घालवून, मग पीटरप्रमाणें पश्चात्तापदग्ध होऊन अश्रुसिंचन करीत बसूं नये हीच इच्छा आहे. दिव्य प्रकाशाचें दर्शन ईशकृपेनें घडल्यावर, हा प्रकाश पडद्याआड दडवून ठेवण्याचा प्रयत्न केवळ मूर्खताच करील. महान् सामर्थ्यानें अंतःकरणांत प्रवेश केल्यानंतर 'नको हें सामर्थ्य' अशी वासना केवळ वेडयाच्याच मनांत येऊं शकेल. या आमच्या लोकसमाजाला स्वराज्य या साध्याचें दर्शन प्रत्यक्ष ईश्वरानें घडविलेलें दर्शन आहे. हें स्वराज्य म्हणजे केवळ राजकीय स्वातंत्र्य नव्हे; हें स्वराज्य म्हणजे अतिव्यापक, समग्र स्वातंत्र्य होय––व्यक्तीचें स्वातंत्र्य, समाजाचें स्वातंत्र्य, राष्ट्राचें स्वातंत्र्य, आध्यात्मिक स्वातंत्र्य, सामाजिक स्वातंत्र्य, राजकीय स्वातंत्र्य हें सर्व कांहीं 'स्वराज्य' या साध्यांत अंतर्भूत आहे. आमच्या पुरातन ऋषींनीं आमच्या आध्यात्मिक स्वातंत्र्याची घोषणा पूर्वीच केलेली आहे. बुद्ध, चैतन्य, नानक, कबीर आणि महाराष्ट्रांतील संत यांच्या संदेशाचा एक भाग सामाजिक स्वातंत्र्याला वाहिलेला होता; राजकीय स्वातंत्र्य हा त्रिमुखी अविभाज्य स्वातंत्र्यवेदाचा तिसरा, शेवटचा घटक आहे, तिसरा शेवटचा 'मंत्र' आहे. मानवाचा आत्मा राजकीय स्वातंत्र्याच्या अभावीं पंगू असतो, दुबळा राहतो. परिस्थितीवर मात करणारे बलशाली आत्मे फार थोडे असतात. सामान्य मानव परिस्थितीचा गुलाम असतो; सामान्य मानवाच्या परिसरांत नीचता, गुलामी वृत्ति, अधमपणा भरला असेल, तर तो स्वतःहि नीच, गुलामी वृत्तीचा आणि अधम बनेल. सामाजिक स्वतंत्रतेचा जन्म तेथेंच होऊं शकतो, जेथें मानवाचा व्यक्तिगत आत्मा विशाल, स्वतंत्र आणि उदार असतो; क्षुद्र हेतूंचा, क्षुद्र विचारांचा दास असत नाहीं. सामाजिक स्वतंत्रता हा कांहीं विशिष्ट सामाजिक यंत्रणेचा परिणाम नसतो––मानवी बुद्धीची स्वतंत्रता आणि मानवी आत्म्याची उदात्तता यांचा तो परिणाम असतो. क्षुद्र साध्यांच्या मागें लागलेला मनुष्य आपल्या सहचारी मानवांविषयीं खरा बंधुभाव अनुभवूं शकत नाहीं; कारण त्याला नित्य ध्यास लागलेला असतो तो इतरांवर वर्चस्व मिळविण्याचा, इतरांवर आपले क्षुद्र श्रेष्ठत्वाचे अधिकार गाजविण्याचा. जातीमुळें किंवा संपत्तीमुळें त्याला श्रेष्ठत्व लाभलेलें असेल, तर तो जातिनिर्मित किंवा संपत्तिनिर्मित उच्चनीच भेदांना उराशीं कवटाळून बसेल. अर्थात् अशा परिसरांत सामाजिक स्वतंत्रतेचा अभावच असणार. आतां या बाबतींत राजकीय स्वतंत्रतेविषयीं सांगावयाचें, तर प्रथम ही गोष्ट सांगितली पाहिजे कीं, राजकीय स्वतंत्रतेचा जेथें अभाव असेल तेथें, समाजापुढें महान् साध्यांचा अभाव असल्यानें, समाजघटक व्यक्ति संकुचित क्षेत्रांत कोंडल्यासारखी असते आणि या क्षेत्रांत तिची महत्त्वाकांक्षा ही जातीनें, संपत्तीनें किंवा वर्गानें तिला लाभलेलें श्रेष्ठत्व टिकवून धरण्याच्या धडपडीपलीकडे जाऊं शकत नाहीं. राजकीय स्वतंत्रता लाभल्यानें, व्यक्तीचें क्षितिज किंवा कार्यक्षेत्र व्यापक होतें आणि मग ती क्षुद्र महत्त्वाकांक्षांना कवटाळून बसत नाहीं. गुलाम असलेली व्यक्ति उदात्त आणि उदार मनाची होऊंच शकत नाहीं, हेंहि आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे. आपल्या बांधवांच्या सेवेंत स्वतःला विसरून जावें ही गोष्ट अशा गुलाम व्यक्तीकडून होऊंच शकत नाहीं; कारण मी गुलाम आहे ही टोंचणी तिच्या हृदयांत अगोदरच जागृत असते; सेवा ही तिच्या हीन स्थितीची निशाणी म्हणून ती ओळखते, या सेवेला स्वयंस्फूर्त आत्मसमर्पणाचें स्वरूप येऊं शकत नाहीं. व्यक्ति जेथें अशा

अधम स्थितींत काळ कंठीत असते, तेथें, त्या समाजांत सामाजिक स्वतंत्रता हा पदार्थ निपजूं शकेल, हा विचार देखील अर्थशून्य आहे, फोल आहे.

आध्यात्मिक स्वतंत्रता देखील गुलामांच्या देशांत पुष्कळांच्या वांट्याला येऊं शकत नाहीं. अशा देशांत कांहीं थोडेजण योग्याचा मार्ग धरतील आणि आपल्या परिस्थितीवर मात करतील, हें शक्य आहे; परंतु आध्यात्मिक मोक्षाच्या दिशेनें अगदीं पहिलें पाऊल टाकणें देखील अशा गुलाम देशांतील मोठ्या जनसमाजाला केव्हांहि अशक्य असतें. मोक्षाचा मार्ग स्वार्थसाधनांत आहे असें आम्ही कोणीहि समजत नाहीं; आणि गुलाम हा सामान्यतः स्वार्थ-साधनांत मग्न असतो. ईश्वराच्या शोधांत असलेला साधक, त्याच्या भोंवतालीं असलेला जनसमाज, त्याच्या मानवबंधूंचा समाज पीडित, पतित, अधोगत असलेला पाहून उदासीन कसा राहूं शकेल? सर्वभूतांविषयीं सक्रिय करुणा वाटण्यांत संतपण असतें; पूर्णयोगी हा करुणामय असतो, सर्व भूतांच्यासाठीं झटण्याच्या इच्छेनें त्याचें अंतःकरण भरलेलें असतें. कोणी मनुष्य, त्याच्या सभोंवार चाललेला यातनांचा आक्रोश ऐकूनहि जेव्हां आपल्या हृदयाचे दरवाजे घट्ट बंद ठेवतो, आपले मानवबंधू दुःखांत आहेत, जुलुमाखालीं आहेत, स्वार्थी लोकांच्या धनलोभाला बळी दिले जात आहेत हें पाहूनहि आपल्या आत्मसमाधानाला धक्का बसूं देत नाहीं––तेव्हां तो आपल्या मोक्षाच्या मार्गांत अनेक अडचणी व अडथळे उत्पन्न करीत असतो; ईश्वर केवळ स्वतां-मध्येंच नसून सर्वांमध्येंहि आहे हें सत्य तो विसरतो. सारांश राजकीय गुलामी भोगणाऱ्या दुबळ्या जनांना आध्यात्मिक स्वतंत्रता लाभणें ही सुतरां अशक्य गोष्ट आहे. आमचा भारत स्वतंत्र होता, तेव्हां स्वर्गाच्या जिन्यावर भक्कमपणें पाऊल ठेवून चढणारे हजारों लोक येथें होते. स्वातंत्र्यसूर्यानें आपले किरण भारतावरून काढून घेतले, भारतांत रात्र वाढत गेली, तेव्हां प्रत्येक भारतीयाच्या अंतःकरणांत जन्मसिद्ध असलेलें आध्यात्मिक बळ कमी कमी होत गेलें––असें होत होत शेवटीं आजला भारतीय आत्मबलाचा दीप इतका मंद झाला आहे, कीं अ-भारतीयांनीं आमचे आध्यात्मिक गुरु होण्याची भूमिका पत्करली आहे––ज्या परकीयांच्या पूर्वजांना अध्यात्माचा प्रकाश लाभला नव्हता, त्या परकीयांच्या पायाशीं आम्हां भारतीयांना आज बसावें लागत आहे. भारत हा देश ईश्वरानें पवित्र आध्यात्मिकतेचें शाश्वतचें उगम-स्थान म्हणून निवडलेला आहे; या उगमस्थानांतील आध्यात्मिकतेचा झरा तो ईश्वर केव्हांहि कोरडा पडूं देणार नाहीं. येथील आध्यात्मिकतेचा झरा कोरडा पडूं नये, म्हणूनच ईश्वरानें आम्हांला 'स्वराज्य' या साध्याचा साक्षात्कार घडविला आहे; हें साध्य सिद्ध करून आम्ही आपलें राजकीय स्वातंत्र्य परत मिळवूं आणि या स्वातंत्र्याच्या आधारानें आमचें आध्यात्मिक स्वातंत्र्यहि पुनः आत्मसात् करून घेऊं. या संतांच्या आणि ऋषींच्या भूमींत पुनः नव्यानें पुरातन योगाग्नि प्रज्वलित होईल आणि येथील लोकांची अंतःकरणें योगबलानें पुनः उंचावून सनातन परमात्म्याचें सामीप्य उपभोगतील.

अनुवादक–सेनापति पां. म. बापट

# श्रीअरविंद् वाङ्मय

(लेखांक ४ था)

## अतिमानव

पूर्णयोगाच्या साधकाला, अन्य सर्व योगमार्गाच्या साधकांप्रमाणेंच, त्याला आक्रमावयाच्या मार्गाचें अंतिम ध्येय, त्याचें स्वरूप यांचें प्रथमतःच निश्चित व अचूक ज्ञान असणें अत्यावश्यक आहे. आपल्या ध्येयामध्यें अंतर्भूत होणाऱ्या सर्व गोष्टी आणि त्यांचे तात्कालिक व भावी परिणाम शक्यतितक्या यथार्थरीतीनें साधकानें जाणून घेतले पाहिजेत; म्हणजे कोणतेच प्रयत्न निष्फळ होणार नाहींत किंवा वक्र मार्गास नेणारे ठरणार नाहींत आणि साधनाप्रवासाच्या अंतिम उद्दिष्टास अयोग्य असें कोणतेंच वळण घेतलें जाणार नाहीं.

आपल्या अपूर्ण मनाच्या सीमा ओलांडून, मनाच्या कमतरता नसलेलें, मनाहून पलीकडे असलेलें अतिमानस, मानवाच्या ठिकाणीं जागृत करणें हा या योगाचा उद्देश आहे. म्हणजेच मानवाचा विकास होऊन तो अतिमानव व्हावयाचा आहे.

अतिमानव म्हणजे नेमकें काय?

अतिमानवाविषयीं सर्वसामान्यपणें जी धारणा अथवा अपधारणा आहे, त्याप्रमाणें अतिमानव म्हणजे सामान्य मानवाचीच केवळ मोठी, गौरवित केलेली आवृत्ति नव्हे हें कांहीं सांगावयास नकोच. ज्या मनुष्याचें सामर्थ्य व शक्ति, त्याच्यापेक्षां कमी भाग्यवान् अशा त्याच्या मानवबंधूंपेक्षां असामान्य मर्यादेपर्यंत वाढलेली आहे आणि आपल्या श्रेष्ठ बल-सामार्थ्यामुळें जो त्यांच्यावर वर्चस्व गाजवीत आहे, अशी अतिमानवाची मूर्ति, नीत्झेसारख्या प्राणबलवादी (Vitalist) विचारकांनीं रूढ केलेली आहे. पण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, अशी व्यक्ति शेवटीं मानवच राहते. येवढेंच कीं, तिच्या शक्तींचा अंमल अधिक व्यापक क्षेत्रावर चालतो; तिच्या 'अहं' भोंवतींच त्या साऱ्या शक्ती जमलेल्या असतात; आणि हा 'अहं' पूर्वीपेक्षां अतिशय वाढलेला असतो. असा अतिमानव म्हणजे खरोखर दैत्य, असुरच. पण विश्वाच्या विकासक्रमामध्यें असलेलें अशा असुरांचें काम आतां सुदैवानें संपलेलें आहे. आमची अतिमानवासंबंधींची धारणा वेगळी आहे. या अतिमानवाच्या, शरीर, प्राण, मन आणि आत्मा या अस्तित्वाच्या सर्व पातळींवरच्या सारभूत शक्ती शक्यतितक्या व्यापक आणि उच्च स्वरूपांत विकसित झालेल्या, परिपूर्ण रीतीनें सर्वांगांनीं वाढविलेल्या असतात; पण त्याचवेळीं अहंकार आणि अज्ञान यांच्या सर्व अशुद्धी धुवून टाकून, तो देवत्व पावलेला असतो. प्रकृतीच्या राज्यांतून वर उठून, आत्मस्वातंत्र्यामध्यें विराजमान होऊन, तेथून तो प्रकृतीच्या सर्व हालचालींचें नियंत्रण करीत असतो. तो स्वतःच्या जीवनाचा स्वामी, 'स्वराट्' असतो.

दुसऱ्यांच्या जीवनावरहि त्याचें स्वामित्व असतें, पण अगदीं वेगळ्या अर्थानें. अस्तित्वाच्या आंतरतम भागामध्यें तो त्यांच्याशीं एकत्व पावलेला असतो, त्यांचें हृदय-स्पंदन हें आपलें स्वतःचेंच हृदय-स्पंदन आहे अशी त्याची अनुभूति असते. त्यांच्या शक्ती आणि सामर्थ्यें

हीं त्यांच्याच प्रगतीसाठीं दिलेलीं आपलींच सामर्थ्यें आणि शक्ती आहेत अशी प्रतीति त्यास येत असते. विभक्त अहंकाराच्या बंधनांतुन मुक्त होऊन, तो आपली जाणीव इतकी व्यापक करतो, कीं भोंवतालचें सारें विश्वच तो त्याच्यांत सामावून टाकतो. आपल्या शक्तींच्या बळानें नव्हे, तर प्रेमाच्या बाहूंनीं तो अखिल विश्वाला कवटाळतो. स्वतःच्या प्रबुद्ध आणि उज्ज्वल अशा अस्तित्वामध्यें भोंवतालच्या व्यक्तींच्या सर्व हालचाली स्वीकारून, त्या उन्नत करून तो त्या परत करतो, त्यावेळीं दिव्य रूपांतरकारी स्पंदनांनीं त्या भारावल्या जातात. त्याच्या सभोंवतालच्या परिस्थितीवर या स्पंदनांचा सतत दाब पडून त्या योगें परिस्थितीला, त्याच्या जीवनसत्यास अनुरूप अशी घडण मिळते. अशारीतीनें तो विश्वनियंता होतो, 'सम्राट्' होतो.

मनाचा विशेष गुणधर्म जो विभक्तता, तिच्या कायद्याचा तो अतःपर अंकित नसतो. मनाचें अधिराज्य असतांना, मनुष्यामध्यें ज्याप्रमाणें, ज्ञान, प्रेम, शक्ति, एकता इत्यादि अस्तित्वाच्या विविध तत्त्वांचा संघर्ष चाललेला असतो आणि केवळ स्वतःचीच अभिव्यक्ति व्हावी या उद्देशानें प्रत्येक तत्त्व अन्य तत्त्वांना दडपून टाकण्याचा प्रयत्न करीत असतें, तसा विसंवाद आणि संघर्ष अतिमानवामध्यें आढळून येत नाहीं. सर्वच तत्त्वें संपूर्ण रीतीनें वाढत असतात आणि अन्य सर्व तत्त्वांच्या परिपूर्णतेनें त्यांचें स्वतःचें पूर्णत्व साधत असतें. उमलत्या गुलाबपुष्पाच्या विविध पाकळ्यांप्रमाणें त्या शक्ती वा तत्त्वें असतात. प्रत्येक तत्त्वाचा भिन्नभिन्न सूर एकमेकांत मिसळून, त्यांतून सुसंपन्न सुसंवाद निर्माण होतो आणि ईश्वराच्या हातांमधील विश्ववीणेच्या अनंत स्वर-मालिका तो आपल्या जीवनांत घुमवितो.

हाच अतिमानव याचा अर्थ ; दुसरा कांहीं नाहीं. याच उद्देशाकरितां एकाग्रचित्तानें मनुष्यानें प्रयत्न केला पाहिजे. आत्म्याच्या सतत वाढत्या प्रकाशानें प्रज्वलित झालेल्या संकल्पशक्तीचा पावलोंपावलीं उपयोग करून, कनिष्ठ प्रतीच्या जीवनाकडे ओढणारी प्रत्येक गोष्ट काढून टाकून, उच्चतर जीवनाकडे नेणारीच गोष्ट त्यानें निवडली पाहिजे. मग हा मार्ग किती कां खडतर आणि कष्टप्रद असेना ! पण अशी निवड करण्याला मनुष्य स्वतंत्र आहे काय ? वास्तविक पाहतां मनुष्य म्हणजे विश्वांतील शक्तींच्या सोसाटयांत इकडून तिकडे उडणाऱ्या वाळक्या पानासारखा नाहीं काय ? स्वतः वा दुसऱ्यानें घडविलेल्या 'कर्माच्या' अंकुशाच्या टोंचण्या सोसत राहिलेला तो एक प्राणी नाहीं काय ?

-२-

श्रीअरविन्द म्हणतात, दैववाद किंवा नियतिवाद यांत कांहीं सत्य आहे; त्याबरोबरच ते हेंहि सांगतात कीं, स्वेच्छा किंवा स्वतंत्र इच्छा यांमध्येंहि कांहीं सत्य आहे. दिव्यशक्तीनें कामास लावलेल्या एकाच विश्वशक्तीच्या त्या दोन क्रिया आहेत. विश्व म्हणजे महान् संकल्पशक्तीचा एक आविष्कार आहे. त्या संकल्पशक्तीचा उद्देश परिपूर्ण करण्यासाठीं, तिनेंच घालून दिलेल्या मार्गानें विश्वांतील प्रत्येक गोष्ट घडत आहे. या अर्थानें पाहिलें, तर जें जें कांहीं घडतें, तें तें सर्वकाहीं पूर्वनियोजित असतें. परंतु हा संकल्प, स्वतःच निर्मिलेल्या शेंकडों प्रवाहांमधून जणुं अनेक वेटोळीं असलेल्या शक्तीच्या रूपानें कार्य करतो. व्यक्तीमध्यें

'स्वातंत्र्य', 'स्वेच्छा' या भावनेच्या द्वारां, म्हणजे कोणत्याहि गोष्टीची निवड करण्याला किंवा कार्य करण्याला आपण मुक्त आहोंत, स्वतंत्र आहोंत या व्यक्तीच्या भावनेच्या द्वारां त्या संकल्पाचें कार्य सर्वांत अधिक परिणामकारक रीतीनें होतें. स्वतःचा संकल्प साध्य करण्यासाठीं सर्वेश्वरानें योजिलेली एक कृति म्हणजे हें व्यक्तीचें स्वातंत्र्य किंवा स्वेच्छा होय. व्यक्तीची इच्छा ही विश्वाच्या इच्छेचा एक अंश असून, एक वर्तुलखंड असून, विश्वेच्छा हीहि शेवटीं एकमेव संकल्पशक्तीच्या महान् योजनेंत नियोजित झालेलेंच काम करीत असते.

तरीहि, विशिष्ट मर्यादांच्या आंत असतां, तेथें तरी निवड करण्यास मनुष्य स्वतंत्र असतोच.

या भौतिक जड जगतावर नियंत्रण करणाऱ्या कठोर कार्यकारणभावाचा कायदा निश्चय-पूर्वक प्रतिपादण्यासाठीं, आधुनिक विज्ञान अनुवंशिकता आणि परिस्थिति या ज्या दोन निसर्ग-नियत घटकांवर भर देतें, ते दोन घटक सुद्धां, आत्म्याला त्याच्या उत्क्रांतिक्रमामध्यें प्रत्येक चढत्यावाढत्या पायरीवर स्वतंत्र निवड करतां यावी म्हणून सर्वज्ञ बुद्धिमत्तेनें पुरविलेल्या आवश्यक गोष्टीच आहेत. एकदां निवड केल्यानंतर हे घटक आपलें कार्य करूं लागतात; मग त्यांना कोणत्याहि नांवानें संबोधा ! पण प्रथमतः निवड करतो आत्माच. शिवाय प्रत्येक क्षणीं जाणीवपूर्वक केलेल्या आपल्या 'कर्माच्या' साह्यानें आपली भावी नियति ठरविणाराहि आत्माच असतो.

व्यक्तीची इच्छाशक्ति हा वैश्विक संकल्पशक्तीचा एक भाग असतो आणि या दोहों-मधील सुसंगति शोधून काढण्यांतच प्रगतीचें रहस्य सामावलेलें असतें. महान् उच्चतर संकल्प-शक्तीच्या मागणीकडे दुर्लक्ष करून, स्वतःच्याच अहंकारी इच्छेनें वागण्याचें जोपर्यंत मनुष्य पसंत करतो, तोंपर्यंत तेथें नेहमींच संघर्ष, झगडा किंवा अरिष्टहि ओढवतें. पण त्या उच्चतर इच्छेशीं एकरूप होऊन, तिच्या हातचें साधन होण्यास जर मनुष्य शिकला, तर संघर्ष मिटतो आणि सुसंवादी कार्य निश्चितपणें साधूं लागतें. अशारीतीनें, आपण त्या शक्तीचें साधन व्हावयाचें असतें अशी जाणीव निर्माण होणें ही पहिली आवश्यक गोष्ट आहे.

-३-

विश्वामध्यें भगवंताचा जो आविष्कार झालेला आहे, त्याचें सत्य आत्मसात् करून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या साधकाच्या दृष्टीनें सारे कर्म हें भगवंतासाठीं आणि भगवंताकरवीं घडत असतें. प्रत्येक कर्मामध्यें त्या कर्माचा एक 'स्वामी' असतो, तें कर्म करणारा 'कर्ता' असतो आणि कर्माचें एक 'साधन' असतें, हें त्यानें जाणलेलें असतें. यांपैकीं आपण कर्माचे 'स्वामी' तर नाहींच, पण 'कर्ते'हि नाहीं, हेंहि त्यास माहीत असतें. तो असतो केवळ एक 'साधन.' तो राजीखुषीनें साधन झालेला असतो, कर्म करण्यास तत्पर असतो; दिव्य कार्य-कारी इच्छेचें निर्दोष वाहन वा सेवक व्हावें हें एकच एक ध्येय त्याच्यासमोर असतें आणि भगवंतानें अशारीतीनें साधन म्हणून आपली निवड करावी हें त्यास भाग्याचें वाटतें, त्यांतच त्याचा सारा आनंद असतो. आपल्या आंतरतम, गूढतम आत्म्याची आज्ञा काय आहे याचा कानोसा घेऊन, या प्रधान आत्म-स्वराला संवादी असे, आपल्या अस्तित्वांतील

अन्य अंगांचें स्वर तो लावतो आणि खऱ्या कार्यकर्त्याचे, म्हणजेच प्रकृतीचें आनंदी व जाणतें साधन तो होतो.

ही प्रकृति म्हणजे सर्वोच्च प्रकृति (All-Nature) आणि प्रत्येक व्यक्तीची प्रकृति म्हणजे तिचीच एक क्रिया. ह्या सर्वश्रेष्ठ प्रकृतीची शक्ति एकसमयावच्छेदानें व्यक्तीमध्यें आणि विश्वामध्यें कार्यकारी होते व आपलें उद्दिष्ट साध्य करते. आपल्या अंतरंगांत आणि सभोंवतींहि एकच प्रकृति कार्य करीत आहे, ही वस्तुस्थिति साधकाच्या लक्षांत येते आणि क्रमाक्रमानें तो सर्वश्रेष्ठ प्रकृतीच्या अनंत शक्तीशीं एकरूप होऊं लागतो. हें ज्ञान होऊन, त्याची जाणीव जसजशी व्यापक आणि गभीर होऊं लागते, तसतसें त्याला हेंहि समजून येतें कीं, प्रकृति ही सुद्धां, सर्व कांहीं स्वतांसाठीं करीत नसून, त्या 'एकम्' साठीं, पुरुषासाठीं, तिच्या 'स्वामी'साठीं ती सारें कांहीं करीत आहे.

भगवंताची इच्छा कार्यकारी करणारी गतिशील प्रेरणारूप प्रकृति ज्याप्रमाणें तो स्वतांमध्यें ओळखतो, त्याचप्रमाणें शेवटीं आपल्या अस्तित्वाच्या सर्वोच्च पातळीवर स्थित असलेल्या भगवंताचें अस्तित्वहि तो अनुभवतो. अशारीतीनें साधन, कर्ता आणि स्वामी या तीन भूमिकांचें रहस्य जेव्हां साधक उमगेल आणि त्याप्रमाणें आचरण करूं लागेल, त्याचवेळीं आपल्या कर्माचा, भगवंताच्या लीलेंतील आपल्या वांट्याचा खरा संपूर्ण आनंद तो उपभोगूं शकेल, त्यास त्याचा लाभ होईल.

—मा. पुं. पंडित.

# श्रीअरविन्दांच्या जीवनांतील घटना-प्रवाह

(श्रीअरविन्दांच्या जीवनांतील उल्लेखिलेले खालील प्रसंग वा घटना या त्यांच्या केवळ बाह्य जीवनांतील अगणित घटनांपैकीं कांहीं आहेत. त्यांच्या जीवनाचा कितीतरी मोठा भाग दृष्टीआड घडलेला आहे. तरीपण या घटनांवरूनहि वाचकांस त्यांच्या जीवनाची बहुविध संपन्नता दिसून आल्याशिवाय राहणार नाहीं. कांहीं नवीन माहितीहि यांत वाचकांना वाचावयास मिळेल.—**संपादक**)

## कौटुंबिक माहिती, जन्म व बालपण

**१८७२ ऑगस्ट १५** पहांटें ४-३० वाजतां मनमोहन घोष यांच्या घरीं जन्म. श्रीअरविंदांचे वडील डॉ. कृष्णधन घोष यांचे हे गृहस्थ एक मित्र, एक समाजधुरीण व बॅरिस्टर होते. डॉ. कृष्णधन हे इंडियन मेडिकल सर्विसमध्यें असून, त्यांचें घराणें म्हणजे बंगालमधील हुगळी जिल्ह्यांतील कुन्नगरचें सुप्रसिद्ध घोषघराणें होय. भारतीय राष्ट्रधर्माचे पितामह म्हणून प्रसिद्ध असलेले ऋषि राजनारायण बोस, यांची कन्या श्रीमती स्वर्णलता ही श्रीअरविन्दांची माता.

श्रीअरविन्दांना तीन भाऊ व एक बहीण होती. सर्वांत थोरले बंधु विनयभूषण व त्याखालचे मनमोहन; या दोघांबरोबरच श्रीअरविन्दांचें शिक्षण इंग्लंडमध्यें झालें. शिक्षण संपल्यावर विनयभूषण कुचबिहार संस्थानमध्यें सरकारी नोकरी करूं लागले व कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्यें इंग्लिशभाषेच्या अध्यापकाचें काम मनमोहन हें करूं लागले. मनमोहन हे चांगल्या प्रतीचे कवि होते. एडमंड गूज सारख्या कित्येक इंग्लिश साहित्यिकांनीं व कवींनीं त्यांच्या काव्यगुणाचें कौतुक केलें होतें. मनमोहन नंतर श्रीअरविन्द व त्यांच्या पाठीवर सरोजिनी ही त्यांची बहीण. नुकतेच परलोकवासी झालेले श्रीबारीन्द्रकुमार हे या सर्व भावंडांत धाकटे होत.

**१८७२-७७** श्रीकृष्णधन सिविलसर्जन असतांना खुलना येथें आपल्या आईवडिलांसमवेत श्रीअरविन्दांचा निवास.

**१८७७-७९** दार्जिलिंग येथें Loretto Convent School मध्यें शिक्षण घेत असतां, श्रीअरविन्दांना अगदीं प्रथमच आध्यात्मिक स्वरूपाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

## इंग्लंडमध्यें

**१८७९-८४** ड्रुइट नांवाचे, डॉ. कृष्णधन यांचे स्नेही मँचेस्टरला होते. त्यांच्या घरीं शिक्षणार्थ निवास. या गृहस्थांनीं त्यांना घरींच लॅटीन शिकविलें. त्यांत इतकी प्रगति झाली कीं, त्यामुळें त्यांना एकदम माध्यमिक शाळेंतच प्रवेश मिळाला.

**१८८२** भविष्य काळांतील महान् बहुविध सामाजिक व राजकीय घटनांमध्यें आपलें विशिष्ट स्थान आहे अशी जाणीव त्यांना या सुमारास झाली.

**१८८४-९०** लंडनमधील सेंट पॉल शाळेंत शिक्षण. ग्रीक भाषेचा अभ्यास. १८८६ मध्यें वयाच्या चवदाव्या वर्षी इंग्रजींत काव्यरचना करण्यास प्रारंभ. तसेंच ग्रीक व लॅटीनमध्यें कांहीं काव्यरचना केली. वाङमयाच्या अधिक अभ्यासाकरितां इतरहि कांहीं युरोपीय भाषांचा अभ्यास केला. तसाच युरोपांतील देशांच्या इतिहासाचा सखोल अभ्यास याच सुमारास त्यांनीं केला. प्राचीन भाषांकरितां ठेविलेलीं सर्वच पारितोषिकें त्यांनीं मिळविलीं.

**१८८५** भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीकरितां भावी काळांत काय कामगिरी करावयाची आहे यासंबंधीं आंतरिक खूणगांठ पटली.

**१८८५-८६** वय चवदावें. पुनश्च अधिक स्पष्ट स्वरूपांत, आगामी जागतिक महत्त्वाच्या घडामोडींत कोणता भाग घेण्याचें ईशनियोजित आहे, याची जाणीव झाली.

**१८९०** सेंटपॉलमधून शिष्यवृत्ति घेऊन पुढील शिक्षणासाठीं केंब्रिजला प्रयाण.

आय, सी, एस्. परीक्षेंत उत्तीर्ण. परंतु घोड्यावर बसण्याच्या परीक्षेला पुनः बसण्याकरितां दिलेली मुदत संपूनहि परीक्षेसाठीं न गेल्यानें आणि इंग्लंडमध्यें भारतसरकारविरोधी भाषणें केल्यानें पदवी मिळाली नाहीं व भारतांत आल्यानंतर सरकारी नोकरींत घेण्याच्या बाबतींत त्यांना नामंजुरी दिली गेली.

**१८९०-९२** केंब्रिज येथें किंग्ज कॉलेजमध्यें शिक्षण. एका वर्षांतच क्लासिकल ट्रायपॉस परीक्षेच्या प्रथम विभागांत उच्चश्रेणीचे गुण मिळवून उत्तीर्ण.

**१८९२** केंब्रिज येथें स्थापन झालेल्या इंडियन मजलिस संस्थेचे सेक्रेटरी झाले. या संस्थेच्या बैठकींत व तेथें शिक्षणार्थ आलेल्या भारतीय विद्यार्थ्यांच्या मेळाव्यासमोर भारतीय राजकारणावर भाषणें व त्यांत स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं सशस्त्र बंडाच्या मार्गाचा पुरस्कार. या भाषणांची नोंद इंडिया ऑफिस ठेवीत असे.

वडिलांच्या उदार स्वभावामुळें दानधर्मांत पैसा खर्च होई व इंग्लंडमध्यें मुलांच्या शिक्षणार्थ पाठविण्यासाठीं पुरेसा पैसा उरत नसे. त्यामुळें खर्चाची ओढगस्त. मुलांना इंग्लंडमधील हा काळ अत्यंत हालअपेष्टांत कंठावा लागला.

## भारतांत

**१८९३** च्या फेब्रुवारींत भारतांत पुनरागमन. मुंबईच्या अपोलो बंदरावर पाय ठेवतांक्षणींच असीम शांति सर्वबाजूंनीं सर्वांगांवर अवतरत असल्याचा सुस्पष्ट असा आध्यात्मिक अनुभव. कित्येक आठवडेपर्यंत ही अनुभूति टिकली.

## बडोदा येथील काळ

**१८९३-९६** बडोदा संस्थानची सरकारी नोकरी. प्रथम राज्यव्यवस्थाविभागांत व नंतर संस्थानच्या सरकारी महाविद्यालयांत फ्रेंच भाषा विषयावर पाठ घेण्याचें आणि शेवटीं

इंग्रजीच्या अध्यापकाचें काम. याच महाविद्यालयांत प्रथम उप-प्राचार्य. नंतर प्राचार्यांच्या जागेवर तात्पुरती नियुक्ति.

**१८९३-९४** मुंबई येथील 'इंदुप्रकाश' मध्यें New Lamps for old या नांवाची एक लेखमाला लिहीली. या मालेंत, त्यांनीं त्यावेळच्या काँग्रेसच्या धोरणांतील पोकळपणा उघडकीस आणला. दुसरी लेखमाला 'बंकिमचन्द्रांचें चरित्र व कार्य' या संबंधीं होती.

स्वप्रयत्नानें संस्कृतचा अभ्यास. त्याचप्रमाणें मराठी, गुजराथी व बंगाली याहि भाषा ते शिकले.

**१८९५** साहित्यक्षेत्रांत पदार्पण. पहिलें प्रकाशन Songs to Mirtylla इंग्लंडमध्यें व बडोदा येथें लिहिलेल्या इंग्रजी कवितांचा हा संग्रह. अर्थात् हें प्रकाशन खाजगी प्रसारासाठीं होतें. याचवेळीं भारतीय इतिहास, पुराणें व पंच महाकाव्यादि प्राचीन संस्कृत साहित्य यांच्या अभ्यासास प्रारंभ. भारतरामायणादि ग्रंथ, उपनिषदें व संस्कृत नाटकें यांच्या भाषांतराचा प्रयत्न. त्याचबरोबर स्वतंत्रपणें काव्य, नाटकें व निबंध यांचेंहि लेखन.

**१८९६-९७** ठाकूरसाहेब यांनीं पुणें येथें सुरू केलेल्या क्रांतिकारकांच्या गुप्त मंडळाच्या अध्यक्षपदीं निवड. नंतर रँड व आयर्स्ट यांच्या खुनानंतर मुंबई प्रांतांतील गुप्त मंडळ्यांच्या मध्यवर्ति संघटनेच्या अध्यक्षपदावर नेमणूक. या मध्यवर्ति संघटनेशीं पूर्वीपासूनच संबंध. त्या संघटनेची अधिकृत शपथ घेऊन ते प्रतिज्ञित संघटक झाले.

**१८९८-९९** सुप्रसिद्ध बंगाली साहित्यिक दिनेंद्रकुमार रॉय यांच्याजवळ बोली बंगाली भाषेचें शिक्षण.

**१८९९** आईचे वडील श्री. राजनारायण बसु यांचा मृत्यु. त्यांना श्रद्धांजली म्हणून एक कविता लिहिली.

**१९०१** एप्रिल—सनातन वैदिक पद्धतीनें, कलकत्ता येथें श्री भूपालचंद्र बसु यांची कन्या श्रीमती मृणालिनी इजशीं विवाह.

बडोदा येथें गाडींतून जात असतां एक आध्यात्मिक स्वरूपाचा अनुभव आला. त्या गाडीस अपघात होण्याच्या क्षणींच शरीरांतून एक प्रकाशमय व्यक्ति बाहेर आली व तिनें त्यांना बाजूस खेंचून अपघातापासून वांचविलें.

**१९०२** महाविद्यालयाच्या मोठ्या सुट्टीमध्यें, बंगालमध्यें गुप्तमंडळ्या स्थापन करण्यासाठीं जाऊन आले.

मिदनापूर येथें गुप्त क्रांतिकारकांच्या एका केंद्राची स्थापना. तसेंच हेमचंद्र कानूंगा व आणखी दोघातिघांनाहि क्रांतिकारकांच्या सांप्रदायाची स्वतः दीक्षा दिली. या सहकाऱ्यांच्या बरोबर निशाणबाजीचा अभ्यास.

बडोदा येथें भगिनी निवेदिता यांची भेट.

अहमदाबाद येथें भरलेल्या काँग्रेस अधिवेशनास उपस्थित. त्याचवेळीं लोकमान्य टिळकांशीं भेट. त्यांच्याबरोबर त्यावेळच्या काँग्रेसच्या राजकीय धोरणाच्या फोलपणाबद्दल चर्चा. जतिन्द्रनाथ बंधोपाध्याय यांस क्रांतिकारकांची संघटना करण्यासाठीं कलकत्त्यास पाठविलें. बडोदा संस्थानच्या सैन्यामध्यें लष्करी शिक्षणाकरितां त्यास श्रीअरविंदांनीं आधींच प्रवेश मिळवून दिला होता.

श्रीअरविन्दांचे धाकटे बंधु बारीन्द्रकुमार यांचें बडोद्यास आगमन.

**१९०३** बारींद्रास क्रांतिकार्याची दीक्षा देऊन, त्या कामांत जतिंद्र यांना मदत करण्यासाठीं कलकत्त्यास पाठविलें. सयाजीराव गायकवाड यांच्या समवेत काश्मीर यात्रा. शंकराचार्यांच्या टेकडीवर अनंत शून्याची आध्यात्मिक अनुभूति. 'भवानी मंदिर' योजना आंखली. गंगानाथ आश्रमांत त्याच पायावर चालूं झालेल्या भारती विद्यालयाची व्यवस्था श्री. के. जी. देशपांडे पहात. ती संस्था टिकविण्यासाठीं श्रीअरविन्दांची मदत. अध्यात्मसामर्थ्यसंपन्न तरूण कार्यकर्त्यांच्या द्वारां स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठीं, राष्ट्रव्यापी क्रांतिकार्याची पूर्वतयारी करणें हें 'भवानी-मंदिर' योजनेचें उद्दिष्ट होतें. 'भवानी-मंदिर' योजनेचा गुप्तपणें सर्वत्र प्रसार. ही योजना सरकारनें जप्त केली व त्यासाठीं कित्येक ठिकाणीं झडत्या घेण्यांत आल्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ही योजना परत मिळूं शकली.

**१९०४** श्रीअरविंदांचे जुने स्नेही श्री. चारुचंद्र दत्त (आय्. सी. एस्.) ह्यांची ठाणें येथें नेमणूक. क्रांतिकार्यांत भाग घेण्याची त्यांची इच्छा त्यांनीं श्रीअरविंदांजवळ प्रदर्शित केली. भवानी मंदिराच्या ध्येयाचा स्वीकार केल्याची ग्वाहि दिली.

श्री.दत्त यांच्या बिन्हाडीं राजा सुबोधचंद्र मलिक यांचा परिचय. श्रीअरविंदांना कलकत्त्याच्या नॅशनल कॉलेजचे पहिले प्रिन्सिपॉल नेमावें या अटीवर १ लाख रुपयांची राजा सुबोध मलिक यांची देणगी. कलकत्त्यास असतांना राजा सुबोध मलिक यांच्याच बिन्हाडीं श्रीअरविन्दांचा मुक्काम.

चांदोद येथें श्री. दत्त यांचेसह स्वामी ब्रह्मानंदांशीं भेट. प्राणायाम व इतर योगक्रियांचा अभ्यास यावेळीं चालूं होताच.

मुंबई येथें भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनास उपस्थित. अध्यक्ष सर हेन्री कॉटन. आगामी बंगाल फाळणीस अध्यक्षीय भाषणांत त्यांचा कडक शब्दांत विरोध.

'No Compromise' नांवाची एक पुस्तिका लिहून त्याच्या हजारों प्रति क्रांतिकारकांनीं गुप्तरीतीनें सर्वत्र वांटल्या. पुस्तिकेंतील अनुपम भाषा व युक्तिवाद यांचें श्रीसुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांनीं कौतुक केलें.

**१९०५** बडोदा कॉलेजच्या प्रिन्सिपॉलच्या जागेवर नेमणूक. जवळील कैमूर टेकडीवर 'भवानी मंदिरा'साठीं योग्य जागा शोधण्याकरितां बारिंद्रकुमार यांचें प्रयाण. पण दूषित तापामुळें परत येणें भाग पडलें.

**३० ऑगस्ट**––श्रीअरविंदाचें मृणालिनीस पत्र. त्यांत आपल्या आंतरिक जीवनाविषयीं व भारताच्या स्वातंत्र्यलढ्यांत भाग घेण्याच्या निश्चयाविषयीं सर्व कांहीं स्पष्टपणें कळविलें.

**१६ आक्टोबर**––बंगालची फाळणी. क्रांतिकारकांनीं या फाळणीचा, क्रांतिकारक चळवळीस प्रत्यक्ष प्रारंभ करण्याच्या दृष्टीनें, एक निमित्त म्हणून उपयोग करून घ्यावा, अशी कार्यकर्त्यांना श्रीअरविन्दांची सूचना.

**डिसेंबर**––बनारसच्या कॉंग्रेस अधिवेशनांत राष्ट्रीय वृत्तीच्या कार्यकर्त्यांना, संघटित होऊन स्वतःचें एक स्वतंत्र धोरण निश्चित करण्याच्या व फाळणीविरुद्ध चळवळीची तयारी करण्याच्या कामीं मार्गदर्शन.

## कलकत्त्यास

**१९०६ मार्च**—कलकत्त्यास आगमन. १९१०च्या फेब्रुवारीमध्यें चंद्रनगरला जाईपर्यंत, क्रांतिकारक कार्याचीं सर्व सूत्रें येथून हलविलीं जात. मुख्य केन्द्र हेंच होतें.

याच महिन्यांत बंगाली नियतकालिक 'युगांतर' सुरू झालें. त्यासाठीं स्वतः श्रीअरविन्दांनींहि कांहीं लेख लिहिले.

**एप्रिल**—बारिसाल येथें भरलेल्या बंगाल प्रांतीय परिषदेस उपस्थित. परिषदेनंतर पूर्व-बंगालमध्यें दौरा. निरनिराळया जिल्ह्यांत ठिकठिकाणीं व्याख्यानें दिलीं.

**जून**—बडोदा कॉलेजमधून एक वर्षाची बिनावेतन रजा. कलकत्त्यास नवीनच निघालेल्या नॅशनल कॉलेजच्या प्रिन्सिपॉलच्या जागेवर नेमणूक.

**ऑगस्ट**—विपिनचंद्र पाल यांनीं 'वंदेमातरम्' वर्तमानपत्र सुरू केलें. मुख्य लेखक या नात्यानें श्रीअरविन्दांचें सहकार्य. राष्ट्रीय पक्षाची संघटना करून, राष्ट्रीय पक्षाच्या कार्यक्रमाची पुनर्घोषणा.

'पर्सिअस दि डिलिव्हरर' हें नाटक क्रमशः 'वंदेमातरम्' मध्यें प्रसिद्ध झालें.

**डिसेंबर**—कलकत्त्याच्या खुल्या काँग्रेस अधिवेशनाच्या आधींच्या विषयनियामक समितीच्या बैठकींना उपस्थित राहून त्यांत प्रामुख्यानें भाग घेतला व राष्ट्रीय पक्षाच्या कार्यक्रमांतील कांहीं पायाभूत मुद्दे समितीमध्यें मान्य करवून घेतले.

**१९०७**—या वर्षारंभींच स्वतःच्या खाजगी माणिकतोळा बागेंत क्रांतिकारकांचें गुप्तकेंद्र संघटित करण्यास बारींद्रास सुचविलें.

**एप्रिल**—'Doctrine of Passive Resistence' नांवाची सुप्रसिद्ध लेखमाला 'वंदेमातरम्'मध्यें प्रसिद्ध केली.

**ऑगस्ट** 'वंदेमातरम्' मध्यें युगांतरमधील आक्षेपार्ह लेख पुनर्मुद्रित केल्याबद्दल अटक. या कामीं साक्ष देण्यास विपिनचंद्र पाल यांनीं नकार दिल्यामुळें आरोप शाबीत होऊं शकला नाहीं. परंतु कोर्टाची आज्ञा न मानल्याबद्दल विपिनचंद्र पाल यांना ६ महिन्याची कारावासाची शिक्षा झाली.

वंग कवि रवींद्रनाथ ठाकूर यांनीं श्रीअरविंदांना उद्देशून वंदना लिहिली व त्यांना मार्गदर्शनार्थ आवाहन केलें.

**डिसेंबर १५** च्या सुमारास मिदनापूर जिल्हा परिषदेस, राष्ट्रीय पक्षाचे पुढारी या नात्यानें उपस्थित. मवाळ पक्षाचे नेमस्त स्वरूपाचे व गुलामीवृत्तीस शोभणारे राजकीय डावपेंच उघडकीस आणले. राष्ट्रीय पक्षाच्या धोरणाचा विजय.

**डिसेंबर** सुरतची काँग्रेस. भारतीय राजकारणांतील नेमस्तपणाचें धोरण कालबाह्य ठरल्याची दर्शक घटना. काँग्रेस सभा मोडली.

भारतीय स्वातंत्र्याविषयीं कळकळ असलेले प्रसिद्ध महाराष्ट्रीय योगी साखरेबाबा यांची सुरतमध्यें भेट.

या महिना अखेरीस दुसरे एक महाराष्ट्रीय योगी, विष्णु भास्कर लेले यांची बडोदा येथें गांठ; त्यांच्यापासून आध्यात्मिक साह्य. त्यांच्या सूचनांप्रमाणें ध्यान करीत असतां, निःशब्द ब्रह्माचा साक्षात्कार व मनास पूर्ण निष्पंदावस्थेची प्राप्ति.

**१९०८ जानेवारी १९** मनाच्या त्याच निष्पंदावस्थेंत राहून, मुंबईचें 'सद्यःस्थिति' या विषयावरील सुप्रसिद्ध भाषण झालें. ही अवस्था निरंतरचीच राहून, मनाच्या अतीत भूमीवरून आलेल्या स्फूर्तीद्वारांच यानंतरचीं सर्व भाषणें दिलीं गेलीं व लेखन केलें गेलें. जीवनांतील सर्व क्रियांना भगवंताचें सुस्पष्टपणें मार्गदर्शन होऊं लागलें.

कलकत्त्यास परत जातांना वाटेंत पुणें, नाशिक, धुळें, अमरावती या ठिकाणीं, भारतीय राष्ट्रधर्माचें हृद्‌गत समजावून देणारीं व्याख्यानें दिलीं.

**एप्रिल ३०** खुदीराम बोस व प्रफुल्ल चाकी यांच्याकडून किंग्जफोर्डच्या खुनाचा मुझफरपूर येथें अयशस्वी प्रयत्न झाला.

**मे २** मध्यरात्रीं पोलिसांनीं माणिकतोळा बागेवर छापा घालून, बारींद्रकुमारांसह अनेक तरुण सशस्त्र क्रांतिकारकांना अटक केली व उजाडतां सकाळीं कलकत्ता येथें श्रीअरविन्द यांनाहि अटक केली.

**१९०८-०९** माणिकतोळा कटांतील ३५ क्रांतिकारक तरुणांसह आरोपी म्हणून खटला चालूं असेपर्यंत कारावास. खटला चालूं असतां श्रीअरविंदांची भूमिका पूर्णपणें अंतर्मुख व निर्लिप्त होती.

**ऑगस्ट ३१** माफीचा साक्षीदार झालेल्या नरेन्द्र गोस्वामीचा तुरुंगामध्यें कनय्यालाल दत्त यांजकडून पिस्तुलानें खून. त्यामुळें तुरुंगांत भयंकर खळबळ व घबराट; पण श्रीअरविन्दांची मनःस्थिति अप्रक्षुब्ध.

तुरुंगांतच, जणुं आश्रमवासियाप्रमाणें दिनचर्या. उपनिषद्-गीता वाचन, चिंतन व योगाभ्यास. निश्चित स्वरूपाचा विश्वमय चेतनेचा आध्यात्मिक अनुभव. सर्वांच्या ठिकाणीं आणि सर्वत्र वासुदेवाचें दर्शन. शरीराच्या पूर्णत्वाचें एक साधन म्हणून सर्व शारीरक्रियांवर प्रभुत्वप्राप्ति. जे जे कांहीं चिरकालीन आजार शरीरांत घर करून होते, त्यांचें योगशक्तीद्वारां निर्मूलन. यानंतर पुनरपि कधींच कोणत्याच प्रकारचा गंभीर असा शारीर आजार नाहीं. तुरुंगाधिकारी व निर्ढावलेले गुन्हेगार यांच्या ठिकाणच्या दैवी गुणसंपत्तीचें दर्शन. खटल्यांतील इतर आरोपींच्या ठिकाणीं, बंगालमधील नववंशाचे अग्रदूत होण्याजोगें गुणनिधान पाहिलें. 'बाँबचें तत्त्वज्ञान' या विषयावर चार लेख लिहिले.

चित्तरंजन दास यांचें, बचावाचें ओजस्वी व वक्तृत्वपूर्ण भाषण.

**१९०९ मे ५**–निर्दोषी ठरून बंधनमुक्त.

**मे ३०** ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालेलें, उत्तरपारा येथील भाषण. त्यांत कारावासांतील आपल्या आध्यात्मिक अनुभूतींचा व दृष्टांतांचा जाहीरपणें उल्लेख.

**जून १९** 'कर्मयोगिन्' हें इंग्रजी साप्ताहिक सुरू केलें. तुरुंगांत लिहिलेल्या व इतर कांहीं कविता, तसेंच 'बाजी प्रभू' हें दीर्घकाव्य 'कर्मयोगिन्' मध्यें प्रसिद्ध केलें.

**ऑगस्ट** बंगालमध्यें 'धर्म' नांवाचें साप्ताहिक सुरू केलें. बहुतेक सर्व लेख स्वतःच लिहीत. या दोन्ही नियतकालिकांमधून तत्कालीन राजकीय समस्यांचा उहापोह करतां करतां, आपल्या आध्यात्मिक व योगिक अनुभूतींच्या आधारें भारतीय राष्ट्रधर्माचें आध्यात्मिक महत्त्व विशद करण्याचें कार्य.

कलकत्त्याच्या 'सुप्रभात' या बंगाली मासिकांत आपले कारावासांतील अनुभव प्रसिद्ध केलें. ते सर्व लेख पुढें 'काराकाहिनी' या पुस्तकांत संकलित करण्यांत आले.

**सप्टेंबर** हुगळी येथें भरलेल्या बंगाल प्रांतिक परिषदेमध्यें राष्ट्रीय पक्षाचे पुढारी या भूमिकेवरून महत्त्वाची कामगिरी केली.

**१९१० जानेवारी** तामीळ भाषेंतील एका राष्ट्रीय साप्ताहिकाच्या संपादकास भारतीय स्वातंत्र्य-प्राप्तीविषयीं भविष्यकथन.

**फेब्रुवारी** भगवंताच्या स्पष्ट आदेशानुसार गुप्तपणें कलकत्ता सोडून चंद्रनगर येथें आगमन. मोतीलाल रॉय यांच्या घरीं दीड महिना योगाभ्यासांत व चिंतनांत. नंतर पुनः आदेश झाल्यामुळें चंद्रनगरहून निघून—

**एप्रिल** ४ रोजीं डुप्ले नांवाच्या आगबोटीनें पाँडेचरीस आगमन. तीस वर्षांपूर्वी एका तामीळ योग्यानें भविष्य केलें होतें कीं, उत्तरेकडून एक योगी दक्षिणेंत येऊन, येथें पूर्ण-योगाचा अभ्यास करून, तो त्या योगाची प्रतिष्ठापना करील.

## पाँडेचरीस

(अपूर्ण)

---

मनुष्यामध्यें जें कांहीं गूढतम व उच्चतम आहे त्याला, जें तत्त्वज्ञान, जें वाङ्मय, जी कला आणि जो समाज साजेसा प्रतिसाद देत असतील आणि इंद्रियतुष्टि, प्राणिक अंगांच्या वासनांची तृप्ति किंवा बुद्धिमान्य क्षमता आणि योग्यता यांहून कांहींतरी अधिक साध्य करीत असतील, पण त्याचबरोबर या सर्वांमधील आवश्यक त्या तत्त्वांचा स्वीकारहि करीत असतील—अशा गोष्टींचा शोध करण्यास आजची मानवजात प्रवृत्त होत आहे; अर्थात् अजून तरी तिचा हा शोध म्हणजे गोंधळलेल्या मनःस्थितींत, अस्ताव्यस्त पसाऱ्यामध्यें अनिश्चित-पणानें कांहींतरी चाचपडण्यासारखा आहे.

—श्रीअरविन्द

# वाचकांचे प्रश्न

(वाचकांनीं आपआपले प्रश्न पाठवावेत.)

**श्रीअरविंदांच्या योगामध्यें मानसपूजेचें स्थान काय?**

मानसपूजा ज्या योगमार्गामध्यें केली जाते, तेथें तिचें जें स्थान असतें, तेंच स्थान तिला याहि योगांत आहे. मानसपूजा किंवा आंतरिक पूजन म्हणजे आराध्य विषयाच्या रूपाला मनःचक्षूंपुढें आवाहन करणें. शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें एकाद्या देवतेचें, एकाद्या प्रतिमेचें वा मूर्तीचें किंवा प्रत्यक्ष गुरूचें आवाहन करून, संपूर्ण शरणागत भावानें आपलें प्रेम आणि भक्ति त्याच्या चरणीं अर्पण करणें.

या प्रक्रियेमुळें आपल्या जाणिवेचे सर्व धागे एकत्र होऊन, ते आराध्य विषयावर केंद्रित होतात हें तर खरेंच, पण त्याचबरोबर अंतःकरणांतील भावभावना त्यामुळें जागृत होतात, त्या सतत उदात्त होत जातात आणि अशारीतीनें त्यांची शुद्धि होते. मानसिक क्रियांनाहि इष्ट तें वळण मिळतें; बुद्धिपुरस्सररीतीनें सर्व वृत्ती भक्तिविषयाकडे वळविल्यानें, बाह्य विषयाकडे धांव घेण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीला आळा बसतो आणि हळूं हळूं आपोआपच त्या भक्तिविषयाकडे आकर्षिल्या जातात व तेथें केंद्रित होतात. अशारीतीनें एकाग्रता, मनःशुद्धि व वृत्तींची अंतर्मुखता, त्याचबरोबर मन आणि हृदय ईश्वराभिमुख होणें या दृष्टीनें साधकाला मानसपूजेची चांगलीच मदत होते.

तरीहि आणखी एक गोष्ट मात्र सांगितली पाहिजे, ती ही कीं, अशी पूजा ही या योगाचें अनिवार्य असें अंग नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें त्यापासून उत्तमप्रकारें लाभ करून घेतां येईल, पण तसाच किंवा त्याहून सर्वांगीण असा लाभ अन्य साधनांनींहि साधतां येईल. शिवाय, हा ज्याच्या त्याच्या मनोवृत्तीचाहि प्रश्न आहेच.

★

**सगुण आणि निर्गुण ध्यान पायरीपायरीनें कसें करावयाचें?**

साकार वस्तूवर किंवा निराकार विषयावर ध्यान, अथवा सगुण व निर्गुण ध्यान या एकामागून एक करण्यासारख्या भिन्न भिन्न अशा दोन प्रक्रिया नाहींत किंवा एक श्रेष्ठ आणि दुसरी कनिष्ठ असेंहि समजण्याचें कांहीं कारण नाहीं. एकाद्या व्यक्तीला ध्यानाचा कोणता प्रकार अधिक नैसर्गिक आणि त्यामुळें अधिक परिणामकारक होईल, हें त्या त्या व्यक्तीच्या स्वभावावर, तिच्या मनोवृत्तीवर अवलंबून राहील. असेंहि होऊं शकेल कीं, एकाच व्यक्तीला एका अवस्थेंत सगुण ध्यान उत्स्फूर्त वाटेल, तर दुसऱ्या वेळीं दुसरा प्रकार योग्य वाटेल. ध्यान एकाद्या आकारावर केलें आहे, कां निराकार तत्त्वावर केलें आहे हें तितकेसें महत्त्वाचें नाहीं; त्यापेक्षां मुख्य गोष्ट ही आहे कीं, तें अनायासें झालें पाहिजे. ध्यानविषयावर

वृत्तींचा ओघ अगदीं नैसर्गिकरीतीनें केंद्रित झाला पाहिजे; आणि ज्या विषयाचें ध्यान केलें असेल, त्याचे गुणधर्म व्यक्तीच्या जाणिवेमध्यें सावकाशपणें पण निरंतर आत्मसात् होत राहिले पाहिजेत. ध्यानविषयाच्या बाबतींत, प्रत्येक व्यक्तीनें आपल्या अवस्थेप्रमाणें जी वृत्ति अंतःकरणांत अधिक प्रभावी व अधिक नजीकची अशी आढळून येत असेल, तिचें अनुसरण केलें पाहिजे.

★

**श्रीअरविंदांच्या योगामध्यें प्रगति करून घेण्यासाठीं, कुंडलिनीची जागृति ही एक आवश्यक पायरी आहे काय ?**

नाहीं. या योगांत कुंडलिनी शक्ति जागृत करण्याची जरुरी नाहीं. कुंडलिनी योग किंवा ज्यामध्यें कुंडलिनीचा प्राधान्यानें उपयोग केला जातो अशा साधना, यांमध्यें मूळ तत्त्व हें असतें कीं, ही सुप्त शक्ति देहामध्यें उत्थापित करावयाची, तिच्याशीं आपल्या जाणिवेनें तादात्म्य पावावयाचें आणि शास्त्रपूत साधनामार्गानें अभ्यास करून, सूक्ष्म देहांतील निर-निराळ्या चक्रांमधन त्या शक्तीला डोक्यामधील सहस्त्रदल चक्रापर्यंत चढवत न्यावयाची; त्यामुळें तेथें मनुष्याची भावसमाधि लागते. अशारीतीनें देहगत वैयक्तिक शक्तीवर कुंडलिनी-योगांत विशेष भर दिलेला असतो.

श्रीअरविंदांच्या योगाचें उद्दिष्ट समाधिप्राप्ति हें नाहीं. संपूर्ण मानवी प्रकृतीलाच दिव्य, अतिमानवी बनवावयाची हें त्याचें ध्येय आहे. त्यामुळें सर्वोच्च, दिव्य, सर्वव्यापी शक्तीला अभीप्सेद्वारां सर्वस्वीं समर्पण करणें, हें या योगाचें साधन असून, ती सर्वोच्च शक्तीच योगामधील रूपांतर घडवून आणतें. या साधनमार्गांत समाधि ही, अनेक महत्त्वाच्या पायऱ्यांपैकीं केवळ एक पायरी होऊं शकेल; पण ती सुद्धां या मार्गांत दुसऱ्या पद्धतीं-नींहि मिळवितां येऊं शकेल. या योगामध्यें सुद्धां निरनिराळीं चक्रें खुलीं होतात, जागृत होतात; पण कुंडलिनीयोगाप्रमाणें खालून वर वर अशीं क्रमाक्रमानें नव्हेत; तर ज्या शक्तीला साधक स्वतःमध्यें आवाहन करतो, तिच्या कार्याच्या दडपणामुळें हीं चक्रें आपोआप उघडतात. या योगांत, खालून उत्थापित केलेली शक्ति नव्हे, तर उर्ध्वस्थ महाशक्ति ही साधकाचा योगक्षेम चालविते. अन्य चक्रांबरोबरच मूलाधार चक्रामध्यें सुप्त असलेली शक्तीहि विमुक्त केली जाते आणि कार्यकारीहि केली जाते; पण इतर योगांमध्यें कुंडलिनी-शक्तीचें जें उत्थापन घडवून आणतात, तें आणि महादिव्यशक्तीनें प्रारंभ करून, साधकाच्या ठिकाणीं झालेली चक्रांची जागृति, ह्या दोन्ही गोष्टी एक नव्हेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

—रेवान्

# गीतेची शिकवण

(मागील अंकावरून पुढें)

**मनाहून श्रेष्ठ असलेल्या तत्त्वाचें स्वरूप--**

मनाला या श्रेष्ठ अंगाची अंधुक कल्पना असते; तें आपल्या कक्षेंतल्या ज्येष्ठ-श्रेष्ठ आदर्शांमागें धांवत असतां, बरेच वेळां त्याला या श्रेष्ठतम अंगाचा स्पर्श होतो. त्याच्या अंतरंगांत अगदीं खोल हें श्रेष्ठतम अंग, अवस्था, शक्ति, तत्त्व त्याच्या नजरेस पडतें;--पण तें तत्त्व स्वतःहून अति मोठें, अति उंच, अति दूर असल्याचेंहि मनाला दिसतें; स्वतांहून, स्वतःच्या श्रेष्ठतम आदर्शांपेक्षां श्रेष्ठ, अधिक सारभूत, अधिक जिव्हाळ्याचें, अनंत, एकमेवाद्वितीय असें तें तत्त्व आहे, ही गोष्ट मन ओळखतें. त्यालाच आपण ईश्वर, आत्मा, चैतन्य असें नांव देतों. मनाला या तत्त्वाचें अस्पष्ट दर्शन घडल्यावर, तें या ईश्वरतत्त्वाची ओळख करून घेण्यासाठीं, त्यांत प्रवेश मिळविण्यासाठीं, त्याला स्पर्श करण्यासाठीं, तें पूर्णतया आपलें करण्यासाठीं, त्याच्या संन्निध पोंचण्यासाठीं, तें होण्यासाठीं, कोणत्या तरी प्रकारें त्याच्याशीं एकरूप होण्यासाठीं, त्या आश्चर्यमय रहस्याशीं पूर्ण एकरूप होण्यासाठीं किंवा त्यांत स्वतः विलीन होण्यासाठीं धडपड करूं लागतें. हें ईश्वरतत्त्व, आत्मतत्त्व अति विशुद्ध असल्यानें, मनाच्या कक्षेंतल्या आदर्शांमध्यें व जीवनाच्या वास्तवगोष्टींमध्यें जें अंतर असतें, त्याहून फार अधिक अंतर, हें तत्त्व आणि जीवनाच्या वास्तव गोष्टी यांजमध्यें असलेलें मनाला दिसतें; मनाला त्याच्या परिचित कल्पनांनीं या चैतन्याचें, ईश्वरतत्त्वाचें स्वतांपुढें यथार्थ निरूपण किंवा त्याचा मानसिक आविष्कार करतां येत नाहीं; अर्थात् सामान्यजीवन आणि त्यांतील व्यवहार यांना परिचित असलेल्या कल्पनांनीं या तत्त्वाचें स्वरूप स्पष्ट करणें किंवा त्याचा व्यावहारिक आविष्कार करणें हें तर मनाला अशक्यच होतें. मनाला, जीवनाला अग्राह्य असणारें व अनाकलनीय असणारें ईश्वरतत्त्व ज्या आत्मवाद्यांना श्रेष्ठ आदर्शभूत झालेलें असतें, ते आत्मवादी, कोणतीहि तडजोड करण्यास तयार असत नाहींत. ते मानसिक अस्तित्व त्याज्य मानतात; भौतिक अस्तित्व दोषमय, निर्भर्त्सनार्ह मानतात आणि विशुद्ध आत्मिक अस्तित्वासाठीं तळमळत असतात; हें विशुद्ध आत्मिक अस्तित्व किंवा निर्वाण आम्ही आमच्या मानसिक आणि भौतिक अस्तित्वाचा विलय करून, त्याच्या मोबदल्यांत सुखानें मिळवूं शकतो; आणि हेंच, हे अतिरेकी आत्मवादी करतात. निर्वाण हें त्यांचें ध्येय असतें. आध्यात्मिक साधना मुख्यतः मनोविलयासाठीं व प्राणविलयासाठीं ते करतात--या मुख्य साधनेला साहाय्यक म्हणूनच केवळ ते मन आणि जीवन यांना शक्य तेवढें आध्यात्मिक वळण देतात. व्यवहारांत मानवी मनाला, प्राणतत्त्वाच्या मागण्यांमुळें मोठा प्रश्न पडत असतो--जीवन, वर्तन, व्यवहार एतद्विषयक प्राणमय अस्तित्वाचे प्रश्न त्याला नेहमीं अडचणींत टाकीत असतात, म्हणून अतिरेकी आत्मवादी आपल्या ध्येयसिद्धीसाठीं--निर्वाणासाठीं--जो पूर्वप्रयत्न करतात, त्याची दिशा मुख्यतः भावनात्मक मनाचा पाठिंबा असलेल्या नतिक मनाला आध्यात्मिक वळण देण्याची असते; किंवा असें म्हणतां येईल कीं, नैतिक मनाचे, भावनात्मक

मनाचे जे आदर्श असतात, ते आध्यात्मिक सामर्थ्य, आध्यात्मिक विशुद्धि यांच्या दृष्टीनेंहि, व्यवहारांत आणणें योग्य आहे अशी शिकवणूक ते मनाला देतात. सत्य आणि न्याय्य वर्तनाच्या नैतिक आदर्शाला, त्याचप्रमाणें प्रेम, सहानुभूति, ऐक्यभावना यांच्या भावनात्मक आदर्शाला, जीवन आपल्या व्यवहारांत जें प्रामाण्य, जो अधिकार देतें, त्यापेक्षां अधिक प्रामाण्य, अधिक अधिकार त्यांना देणें योग्य आहे; कारण त्यांत आध्यात्मिक सामर्थ्य व आध्यात्मिक विशुद्धि यांना योग्य मान दिल्यासारखें होतें——अशी शिकवणहि मनाला अतिरेकी आत्मवाद्यांकडून मिळते. विश्वपसाऱ्यामागें जें आत्मतत्त्व, चैतन्य किंवा ईश्वरतत्त्व आहे, तें एकमेवाद्वितीय आहे; आणि म्हणून सर्व जीव, सर्व जीवयुक्त भूतें सारतः एकच आहेत, हें सत्य मानवी बुद्धि व कर्तृत्वोन्मुख इच्छाशक्ति मान्य करते आणि या मान्यतेच्या प्रभावानें नैतिक मनाच्या व भावनात्मक मनाच्या आदर्शभूत गोष्टींना व्यवहारांत श्रेष्ठ अभिव्यक्ति मिळण्यास मदत होते, त्यांना व्यापकांत व्यापक व तेजोमय अधिष्ठान लाभतें. सामान्य मानवी मनाच्या मागण्यांना कोणत्या तरी प्रकारें जोडलेली या प्रकारची आध्यात्मिकता हें, जगांत मोठ्या म्हणून गणल्या जाणाऱ्या धर्मांचें प्रकट सार आहे. उपयुक्त सामाजिक कर्तव्य, सामाजिक व्यवहाराचा तत्कालिन कायदा या आध्यात्मिकतेला मान्य असतो; ही आध्यात्मिकता विशेष संप्रदाय, संस्कार आणि प्रतिमा यांच्या सहाय्यानें लोकप्रिय केलेली असते. या धर्मांना त्यांचे त्यांचे वैयक्तिक विजय लाभतात, उच्चतर प्रकाशाचा एकादा किरण हे धर्म आपल्या अनुयायांना देऊं शकतात. व्यापक आध्यात्मिक किंवा अर्धवट आध्यात्मिक व्यवहारनियमाची छाया ते धार्मिकांना पुरवूं शकतात, धार्मिकांच्या व्यवहारावर लादूं शकतात, परंतु परिपूर्ण यश त्यांना लाभूं शकत नाहीं; शेवटीं या धर्मांना कांहीं तरी तडजोड मान्य करावी लागते आणि याप्रमाणें तडजोडीला हे धर्म मान्यता देऊं लागले कीं, भौतिक प्राणमय जीवनाचा त्यांजवर पगडा बसतो. या जीवनाकडून त्यांचा पराभव होतो या प्रकाराच्या आध्यात्मिकतेनें, या प्रकारच्या धर्मांनीं जीवनाचे प्रश्न सुटत नाहींत; त्याचें रौद्रस्वरूप थोडेसें कमी करण्यांत या आध्यात्मिकतेला, या धर्मांना तात्पुरतें यश आलें असलें, तरी ते पुनः पूर्वपदावर येतात, पुनः पूर्वीचें रौद्ररूप धारण करतात; कुरुक्षेत्राचा जटिल, कठोर प्रश्न अशा प्रश्नांपैकींच एक आहे. आदर्श निर्माण करणारी मानवी बुद्धि, तसेंच मानवाचें नैतिक मन यांना नेहमीं आशा वाटते कीं, हे प्रश्न त्यांच्या प्रयत्नानें केव्हांतरी सुटतील. या प्रश्नांनीं भरलेलें जीवनाचें कनिष्ठ, अनिष्ट अंग नाहींसें करण्यासारखा सुंदर उपाय त्यांना, त्यांच्या तीव्र तळमळीच्या प्रभावानें केव्हांतरी सुटेल आणि हा उपाय ते स्वतःच्या बळावर, चिकाटीनें प्रयत्न करून परिणामकारक करूं शकतील——परंतु ही गोष्ट कांहीं घडून येत नाहीं आणि जीवनाचें कनिष्ठ, अनिष्ट अंग कायम राहतें; तें नाहींसें होत नाहीं. आध्यात्मिकतेकडे वळलेली, आध्यात्मिकता प्राप्त केलेली बुद्धि वरीलप्रमाणें कट्टर आशावादी असत नाहीं. ती धर्माच्या आधारानें मानवाला असें आश्वासन देते कीं, पृथ्वीवर केव्हांतरी यशस्वी अध्यात्मराज्य होणार आहे——परंतु असें आश्वासन देतांनाच तिला पृथ्वीची अपात्रता, अध्यात्मराज्याला पृथ्वी लायक नाहीं ही गोष्ट अर्धवट जाणवते आणि आत्मा हा या पृथ्वीवर एक परका आहे, एक अनाहुत पाहुणा आहे, असें आपलें मत देऊन, ही बुद्धि स्पष्टपणें सांगतें कीं, या पृथ्वीवरील शरीरयुक्त जीवनांत, किंवा मर्त्य मानवांच्या सामुदायिक पार्थिव जीवनांतहि स्वर्ग

किंवा निर्वाण लाभणार नाहीं; हा स्वर्ग किंवा निर्वाण या पृथ्वीपलीकडे असलेल्या अमर स्थानीं आत्म्याला मिळूं शकेल. खरें आध्यात्मिक जीवन त्या अमर ठिकाणीं आहे, इतरत्र नाहीं.

**त्या दृष्टीनें गीतेचा व्यक्तीला संदेश**

विशुद्ध आत्मा, विश्वात्मा, ईश्वर, विश्व व प्रकृति एतद्विषयक सत्य काय आहे याची वरील प्रकारची अध्यात्माची मांडणी पाहून, गीता पुनः मांडणी करण्यास प्रवृत्त झाली. प्राचीन उपनिषदांतून उत्तरकालीन विचारवंतानीं काढलेल्या, विकसित केलेल्या, सत्याचा विस्तार करून आणि त्याला नवें स्वरूप देऊन, जीवन आणि कर्म एतद्विषयक प्रश्न सोडविण्यास या नव्या सत्याचा उपयोग गीतेनें आत्मविश्वासपूर्वक केला आहे. आजच्या मानवजातीपुढें जीवनाचा प्रश्न ज्या स्वरूपांत उभा आहे, त्या स्वरूपांत या समग्र प्रश्नाची सोडवणूक गीतेचें उत्तर करीत नाहीं. प्राचीन काळच्या मानवजातीस उद्देशून गीतेनें जीवनविषयक प्रश्नाचें उत्तर दिलेलें आहे. मानवाची सामुदायिक प्रगति आजचें मानवी मन इच्छित आहे; अशा प्रगतीसाठीं तें जोरदार प्रयत्न करीत आहे. मानवाच्या सामुदायिक जीवनांत, आज आहे त्याहून अधिक विवेकता यावी, अधिक नैतिकता यावी, शक्य तर कर्मपर, आदर्श, आध्यात्मिकता यावी, अशी आज मानवी मनाची आकांक्षा आहे. मानवी मनाची ही इच्छा, आकांक्षा गीतेच्या उत्तरानें पुरी होत नाहीं. गीतेचें उत्तर व्यक्तीला उद्देशून आहे: पूर्ण आध्यात्मिक जीवन जगण्याची पात्रता मिळविलेल्या व्यक्तीला गीतेची हांक आहे; अशा व्यक्तीला उद्देशून गीतेनें अध्यात्माची नवी मांडणी केली आहे. अशी पात्रता नसलेल्या मानवांसाठींहि गीतेचा उपदेश आहे. तो असा—"पुढें पुढें चला, पण सावकाशपणें पावलें टाका; विवेकानें मार्गक्रमण करा; तुमच्या वैयक्तिक प्रकृतीचा धर्म ओळखून, या स्वभावधर्मानुसार प्रामाणिकपणें मार्ग चाला, आपला मार्ग क्रमतांना बुद्धीचा, नैतिक भावनेचा विचार अधिकाधिक प्रमाणांत घेत चला आणि त्या विचारानुसार प्रामाणिकपणें आचार करीत चला, असें करीत करीत शेवटीं आध्यात्मिकतेचें वळणहि आपल्या वागणुकीला लावा." गीतेचा संदेश पाहिला असतां, जीवनाच्या प्रश्नाला इतरांनीं दिलेलीं कांहीं अव्यापक उत्तरें गीता अंशतः मान्य करते असें दिसतें. पण ही मान्यता देतांना या उत्तरांपलीकडे जे उच्चतर, अधिक पूर्ण स्वरूपाचें रहस्य आहे, तिकडे गीता बोट दाखविण्यास चुकत नाहीं. या रहस्यांत प्रवेश करण्याची पात्रता फारच थोड्या व्यक्तींनीं आजपर्यंत मिळविली आहे.

अपूर्ण

—श्रीअरविंद

---

जें करण्याला तुम्ही आज समर्थ नाहीं, तें तुम्ही उद्यां साध्य करूं शकाल. चिकाटी धरा सतत प्रयत्न करा, म्हणजे तुम्ही विजयी होणारच.

—श्रीमाताजी

# विद्यार्थी विभाग

पुढील अंकापासून विद्यार्थी विभागामध्यें विद्यार्थ्यांचेंहि लेखन घेण्याचें ठरविलें आहे. विद्यार्थ्यांनीं आपआपलें लेखन पाठवावें. उत्कृष्ट ठरणारा एक लेख एका अंकांत छापला जाईल व त्यास पारितोषिक देण्यांत येईल. लेख सुमारें ७५ ओळींच्या आंत असावा. विद्यार्थी, शिक्षक व पालक यांचें या कार्यांत सहकार्य मिळेल अशी आशा आहे. विद्यार्थ्यांनें आपलें नांव, वय व पत्ता घालून, कागदाच्या एका बाजूस लिहून १ आक्टोबर पर्यंत लेखन पाठवावें. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनीं प्रश्न विचारावेत. निवडक प्रश्नांचीं उत्तरें देण्यांत येतील.

---

# बोधकण

## तरुणांना एकच उपदेश

"प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासांत असे कांहीं काळ येत असतात, जेव्हां त्याच्यासमोर परमेश्वर एकच कार्य, एकमेव ध्येय ठेवीत असतो. त्याकरतांच केवळ, अन्य सर्व कांहीं, मग तें किती कां उच्च आणि उदात्त असेना, बलिदान करावयाचें असतें. आपल्या मातृभूसाठीं आज असा काळ आलेला आहे; तिच्या सेवेखेरीज आज कांहींहि अधिक प्रिय नाहीं; त्याच ध्येयसिद्धी-करतां अन्य सर्व कांहीं करावयाचें आहे. तुम्ही अभ्यास कराल, तर तो मातृभूमीकरतांच करा. तिच्याच सेवेकरतां शरीराला, मनाला, आत्म्याला वळण लावा. तिच्याच प्रीत्यर्थ जगतां यावें म्हणून उपजीविकेचा व्यवसाय करा. परराष्ट्रांत जावयाचें असेल, तर यासाठीं जा कीं, त्यामुळें तेथून तुम्ही आणलेल्या ज्ञानाच्या साहाय्यानें तुम्हांला तिची सेवा करतां येईल. कार्य करा तिची भरभराट होण्यासाठीं. दुःख सहन करा, तिचा आनंद वाढविण्यासाठीं. ह्या एकाच उपदेशांत सर्व कांहीं आलें. —श्रीअरविंद.

## खरें बालक व्हा

प्रौढ मनुष्य हा जणुं एकाद्या प्रवाशासारखा असतो; पर्वतावर चढून जाण्याचा सरळ रस्ता किंवा मधली सोपी पाऊलवाट त्याला माहीत नसल्यामुळें, तो टेकड्या टेकड्यामधून भटकत राहतो आणि शिखरावर पोहोंचेपर्यंत त्याचें जवळ जवळ सारें आयुष्य खर्चीं पडलेलें असतें. मधल्या उंचशा पठारावर तो जेव्हां येतो, तेव्हांच तो म्हातारा आणि गलितगात्र होऊन, त्याच्यांत त्राण उरलेलें नसतें. आणखी उंच चढून जाण्यासाठीं त्याच्यांत शक्तीच नसते आणि काळहि संपुष्टांत आलेला असतो.

अर्थात् असेहि कांहीं लोक असतात, ज्यांना मार्ग माहीत असतो, कोणींतरी त्यांना वाट दाखविलेली असते. सोप्या जवळच्या मार्गानें ते चटकन् उंच शिखर गांठतात. तेथें पोहोंचल्यावर

सुद्धां त्यांच्यांत दम राहिलेला असतो, उत्साह कायम असतो; तेथून ते विस्तीर्ण क्षितिजाकडे दृष्टिक्षेप टाकतात आणि आणखी कोणत्या चढणी चढून जातां येतील याचा अंदाज घेतात.

पहिल्या प्रथम ज्या लोकांचें उदाहरण घेतलें, त्यांना पलीकडे कांहीं पाहण्याची इच्छा तर नसतेच, पण उलट त्यांना असें वाटत असतें कीं, आपण महत्कार्य केलेलें आहे, आपण इतका दीर्घ प्रवास केला आहे आणि आतां आपल्याला हक्काची विश्रांति मिळाली पाहिजे.

पण, बाळांनों, आजच्या काळांत तुमची स्थिति अगदीं निराळी आहे हें ध्यानांत धरा. जणुंकांहीं विजेच्या अधांतरीं टांगत्या गाडीमध्यें बसून तुम्ही चाललेले आहांत. अगदीं पायथ्यापासूनच गाडींत बसवून, जणुं एकदम पर्वतमाथ्यावर तुम्हांला आणून सोडलेलें आहे. तेथें सबंध जगापुढें तुम्ही उभे राहून, स्वतःचें नीट परीक्षण कराल आणि पुढच्या साहसी चढणीसाठीं कोणतें शिखर घ्यावयाचें याची योग्य ती निवड कराल. पण जर तुम्ही नेहमीं उत्साहपूर्ण, बालभावयुक्त, आनंदी आणि प्रसन्न रहाल, तरच हें सर्व करूं शकाल. मुलांनों, बालकभावांत राहण्यामध्यें तुम्हांला आनंद वाटला पाहिजे, सर्वश्रेष्ठ कारागिराच्या–देवाच्या–हातांतील संस्कारक्षम लवचिक मऊ माती होण्यांत तुम्हांला धन्यता वाटली पाहिजे.

## काळाशीं मैत्री करा

"काळ आपला मित्र कसा होईल ?"

तुम्ही काळाकडे कोणत्या दृष्टीनें पाहतां यावर तें अवलंबून राहील. त्याच्याशीं तुम्ही कसा संबंध ठेवतां, काय नातें जोडतां यावरहि तें अवलंबून आहे. तुम्ही त्याला मित्र समजाल तर तो तुमचा मित्र होईल, त्याला शत्रु मानाल तर तसा तो होईल.

कदाचित् तुम्हांला असें विचारावयाचें असेल कीं, तो आपला मित्र कधीं असतो आणि शत्रु कधीं असतो, हें कसें ओळखावयाचें ? ठीक आहे. तुम्हांला घाई झालेली असते आणि तुम्हीं म्हणतां "काय करावें? हें माझें काम चटकन् आटपतच नाहीं आहे. कधीं एकदां तें संपेल असें मला झालें आहे !" आणि ताबडतोब ती गोष्ट करून टाकतां आली नाहीं म्हणजे तुम्ही निराश होतां. पहा, नेमकें ह्यावेळीं काळ हा तुमचा शत्रु होतो. पण उलट, जेव्हां तुम्ही म्हणतां, "ठीक आहे. हरकत नाहीं; ही गोष्ट ह्यावेळीं मला करतां आली नाहीं. त्यांत काय आहे? मी ती पुढच्या वेळीं करीन. केव्हांतरी एक दिवस नक्की मला ती करतां येईल अशी मला खात्री आहे"––जेव्हां तुमची ही वृत्ति असेल तेव्हां काळ तुमचा मित्र होतो.

## आनंदी रहा व आनंद द्या

मी तुम्हांला सांगतें––नेहमीं आनंदानें, सुखानें रहा, नेहमीं चांगलें व्हा; चांगलें व्हा म्हणजे अधिक समजुतदार व्हा, तुम्ही अपूर्व अशा परिस्थितीमध्यें वाढत आहां हें लक्षांत ठेवून, उच्च जीवन जगण्याचा, सामान्य जीवनापेक्षां उदात्त, मंगल आणि सत्यमय जीवन जगण्याचा प्रयत्न करा; आणि तुम्ही मिळविलेल्या या उच्च चैतन्याचा, ह्या प्रकाशाचा, ह्या उदारतेचा अल्पसा अंश, एकादा किरण तरी जगामध्यें व्यक्त करण्याचा यत्न करा.

––श्रीमाताजींच्या प्रवचनांमधून.

# अकबर–औरंगजेब

(हे संवाद काल्पनिक आहेत. स्वर्गांत दोघांची गांठ पडली व दोघे आपआपलें ध्येय व कार्य या संबंधीं स्वतःची बाजू मांडत आहेत. गतकालांतील थोरांच्या ध्येयांतील व विचारांतील विरोधाभास उकलून दाखविण्याचा या संवादांत यत्न केला आहे. अशा संवाद-लेखनाचा प्रारंभ लुसियन यानें ग्रीक साहित्यांत केला. याच धर्तीवर कांहीं संवाद श्रीअरविंदांनींहि लिहिले आहेत.––संपादक.)

**अकबर**––बाळा, माझ्या उद्दिष्टाच्या सिद्धीला तूं विलंब केलास, पण तें चूक आहे असें कांहीं तुला दाखवितां आलें नाहीं. उलट, तुझाच मार्ग चुकीचा होता, असें मात्र आज तरी कबूल करण्यास तुला हरकत नाहीं असें मला वाटतें. भारत हा भारतीयांचा आहे; हिंदूंचा नाहीं, मुसलमानांचाहि नाहीं, किंवा कोणत्या एकाद्या विशेष धर्माच्या वा जातीच्या मालकीचा नाहीं–हें मूळतत्त्व जर तूं डोळ्यासमोर ठेवून चालला नाहींस, तर कोठलीच व्यवस्था वा रचना दोन दिवसांपेक्षां अधिक काळ टिकणार नाहीं.

**औरंगजेब**––माझा आदर्श सफल झाला नाहीं, हें कबूल; पण एकदांच नव्हे, वारंवार विफलता आली, साफल्य नाहीं झालें, तरी त्यामुळें आदर्शच चुकीचा आहे, असें मानण्याला कांहीं सबळ कारण आहे असें मला तरी वाटत नाहीं. कोठलाहि विशेष धर्म, विशेष जात यांचा आधार असल्याशिवाय, दुसऱ्या कशाच्या आधारावर देशास संघटित स्वरूप कसें येणार हेंच मला समजत नाहीं. देश म्हणजे कांहीं नुसती डोंगर माती नव्हे किंवा प्राणिसंग्रहालय नव्हे, कीं जेथें नानाप्रकारचे प्राणी, जनावरें आपापलीं घरें करून कसें तरी जीवन कंठीत राहतील ! देशाच्या मागें पाहिजे एक धर्म, एक प्राण; सजीव असें एकत्व आणि कांहींतरी जागृत असा आदर्श. एक जाती, एक धर्म असल्याशिवाय कोठून येणार तो प्राण, तें एकत्व आणि तो आदर्श ?

**अकबर**––कां नाहीं ? देश म्हणजे देश! तुझी धर्मभावना, जातिभावना ही जशी एक जिवंत वस्तु आहे, त्याचप्रमाणें देशभावना ही सुद्धां अगदीं तशीच वस्तु आहे. या दोहों-मधील फरक ध्यानांत धरला पाहिजे. विशेषतः ज्या देशांत अनेक धर्म, अनेक जाती एकत्र आल्या आहेत, त्या देशाची उभारणी केवळ देशात्मभावनेच्याच पायावर झाली पाहिजे; धर्म अथवा जातीविषयीं हट्ट धरून, त्या आधारावर देशाची उभारणी करणें योग्य नाहीं, व तें शक्यहि नाहीं.

**औरंगजेब**––धर्म आणि जाति यांपासून तोडलेली नुसती देशभावना म्हणजे केवळ कल्पना आहे. केवळ बुद्धीचा खेळ आहे. ती एक कृत्रिम व अस्वाभाविक गोष्ट आहे. ती वास्त-वतेंत मिळणार नाहीं. देशात्मभावना म्हणजे तरी काय ? एकाच शिक्षणानें व संस्कारानें एकत्र बांधलेला, एकाच धर्मभावनेनें प्रेरित झालेला, बंधुभावानें एकत्र आलेला, एका भू-खंडावर नांदणारा जो जनसंघ, त्याची एकात्मभावना म्हणजेच देशात्मभावना ना? रक्तसंबंध

नाहीं, ध्येयाचा मेळ नाहीं, एक धर्म नाहीं, जीवनाचा सारखेपणा नाहीं, पण केवळ एकाच भूभागावर राहातात म्हणून एकमेकांना बंधुबंधु म्हणणें, हा भ्रातृभाव फारसा बलवान् किंवा उच्च प्रतीचा ठरेल असें मला वाटत नाहीं आणि तें कधीं शक्य झालें होतें असेंहि कधीं मीं ऐकलेलें नाहीं.

**अकबर**—ठीक. मग नीटपणें आजचें जग तर पहा. स्वित्सर्लंड पहा. तेथें तीन जाती—फ्रेंच, जर्मन, इटालियन आहेत—दोन मोठे धर्म कॅथालिक व प्रॉटेस्टंट आहेत. आतां आयर्लंडकडे पहा. तेथें पण जाति व धर्म या दृष्टीनें दोन भाग आहेत—उत्तरेस अल्स्टर व दुसरा दक्षिणेकडचा गेलिक. पण आयर्लंड अजून राष्ट्र बनलेलें नाहीं. त्या मार्गावर आहे आणि म्हणूनच तेथें द्वंद्व व संघर्ष दिसून येत आहे. परंतु त्या दोन भागांत एकरूपता येण्यास फारसा काळ लागणार नाहीं. आतां कॅनडा पहा—अर्धा भाग इंग्रजांचा व अर्धा फ्रेंचांचा आहे. पुनः बेल्जम पहा—तेथें अर्धे लोक फ्रेंच वळणाचे, फ्रेंच संस्कारानें व शिक्षणानें प्रभावित आणि अर्ध्यांवर जर्मन संस्कृतीचा पगडा आहे.

**औरंगजेब**—हीं उदाहरणें हलक्या प्रतीच्या राष्ट्रांची आहेत. नाना भिन्न जाती, धर्म, धारणा यांमध्यें कशीतरी, कांहींतरी जुळवाजुळव करून, या थातुरमातुर स्वरूपाचें ऐक्य करण्यानें, वीर्य व प्रभाव नाहींसें झालेलें, कोणीकडून जीव धरून राहिलेलें, एकादें लंगडें व दुर्बळ असें राष्ट्र कदाचित् निर्माण करतां येईल; पण तेजस्वी, निर्माणसमर्थ राष्ट्र पाहिजे असेल, तर ऐक्य, संघटना, समभावना, सर्वबाबतींत एकता, जीवनाच्या आदर्शांत मेळ व हें सर्व साधण्याचे यत्न, या सर्वांचीच आवश्यकता आहे. मनुष्य कांहीं जड निर्जीव पदार्थ नाहीं. मनुष्य म्हणजे एक सजीव पूर्ण वस्तु आहे; त्याचा एक भाग दुसऱ्या भागांशीं परस्परांत मिसळलेला आहे. मनष्याकडून कांहीं काम व्हावयाचें, तर त्याचीं सर्व अंगें विचारांत घेतलीं पाहिजेत, कामास लावलीं पाहिजेत. मी पुनः सांगतों, जाति, धर्म, सामाजिक जीवन व व्यक्तिगत जीवनहि सोडून नुसती देशात्मभावना विचारांत घेऊन, सर्वांमध्यें एकत्व-भावना निर्माण करणें ही केवळ कृत्रिम कल्पना आहे, मनाचा भ्रम आहे. धर्म तर मनुष्याच्या जीवनाचा पाया आहे. त्याच्या आंतरात्म्याची ती गोष्ट आहे. धर्म हें त्याचें आत्मधन आहे. धर्म हा आंतरबाह्य सर्व कांहीं व्यापून, मनुष्याच्या रोमरोमीं भिनलेला असतो; धर्मांत अनैक्य पण कर्मांत ऐक्य ! वा: ! असें करण्याला काय सर्व माणसें तत्त्वज्ञानी आहेत ? म्हणूनच मी म्हणतो कीं, भारताला मरावयाचें नसेल, तर त्यानें एक हिंदु, नाहींतर मुसलमान झालें पाहिजे—नाहींतर मरण पत्करलें पाहिजे. हिंदूंनीं भारताला जें कांहीं द्यावयाचें तें दिलें आहे. आतां हिंदु म्हणजे एक गतकालीन शक्ति झालेली आहे. म्हणूनच, मुसलमान म्हणजे भारताला नवीन संस्कारानें नवीन जीवन देणारी एक शक्ति ठरावी यासाठींच मीं सर्व यत्न केले होते.

**अकबर**—देशांतील लोकांना धर्माखेरीज एकत्रच होतां येणार नाहीं असें तूं म्हणतोस, तें मानलें, तर मी विचारतों कीं, तूं धर्म तरी कशाला म्हणतोस ? धर्म, हे बाह्यदृष्टया नाना-प्रकारचे आहेत. मुळांत सर्व धर्म एकच आहेत व सत्यच आहेत हें तुला अजून समजलें नाहीं कां ? एकाच वस्तूला हिंदु म्हणतात भगवान्, मुसलमान म्हणतात खुदा आणि ख्रिश्चन म्हणतात गॉड. ज्यावेळीं शब्दाचा अर्थ न समजतां, केवळ नांवावरूनच लोक लढाया करत,

तो अज्ञानाचा काळ होता. धर्म म्हणजे मनुष्याच्या हृदयांतील जें कांहीं सर्वश्रेष्ठ ध्येय, त्याची आकांक्षा होय. अधिक खोल विचार करून पहा. देशादेशांत, जातीजातींत, धर्मांधर्मांत, युगायुगांत एक आदर्श, एक आकांक्षा सर्व माणसांच्या हृदयांत वसत आहे. देशकाळभेदानें मूळ वस्तूंत फरक पडलेला नाहीं; फरक आहे तो तपशिलाच्या गोष्टींमध्यें व तोहि किरकोळ स्वरूपाचा. मला 'कबाब' आवडेल, तर तुला 'कोप्ता' आवडेल. ही गोष्ट केवळ रुचीची व संवयीची आहे. त्यासाठीं खून, मारामाऱ्या करणें शहाणपणाचें नाहीं; तसेंच धर्माचें विशेष रूप वा आचार कोणाला कोणते आवडतील, कोणाला दुसरे आवडतील; त्यांत वाईट असें काय आहे? ती व्यक्तिगत आवडीनिवडीची गोष्ट आहे. आपला जर कांहीं धर्म असला, जीवनाचा महान् आदर्श आपल्याला असला, तर त्याला आपण काय नांव देतो, त्याला कोणतें रूप देतो या बाबतींत जरा अधिक उदार होण्यास कठीण नाहीं—कारण उदारपणा सुद्धां धर्माचेंच एक अंग नाहीं काय ? हिंदु आपल्या श्रद्धेनुसार गायत्री मंत्र जपतो, पण तो कल्मा म्हणत नाहीं म्हणून नरकांत जाईल असें म्हणणें हें अज्ञानाचेंच नाहीं काय ?

**औरंगजेब**—हे सर्व राजकारणी विचार आहेत. हा धार्मिक मनुष्याचा विचार नाहीं. ज्यानें धर्मभावनेची तीव्र धगधग व धर्माचें प्रबल आकर्षण अनुभवलेलें नाहीं, त्याच्याच तोंडून असे उदासीन व नेभळेपणाचे शब्द बाहेर येतील. मला तर वाटतें कीं, सत्य व त्याचें रूप यांचा संबंध अच्छेद्य आहे. आत्म्यापासून देह निराळा राहूं शकणार नाहीं, त्याप्रमाणेंच धर्म व आचार हे वेगळे करतां येणार नाहींत. नाम व रूप यांमध्यें दृढप्रतिष्ठित नसलेला धर्म, म्हणजे हवेंतील मनोरा आहे. केवळ कल्पनेचा व गप्पांचा विषय आहे. प्राण, जीवन व कर्मक्षेत्र यांचा जो धर्म, त्याला विशेष नांव व रूप असलेंच पाहिजे.

**अकबर**—तुला अजूनहि कळूं लागलेलें दिसत नाहीं; पुष्कळच शिकायचें राहिलेलें दिसत आहे. मीं स्थापन केलेलें येवढें साम्राज्य धुळीस मिळवूनहि, तें कां धुळीस मिळालें हें तुला अजून उमगलेलें दिसत नाहीं. आशा करतों कीं, एक दिवस तुला हें समजेल कीं, भारतवासी हे प्रथम भारतीय असून, नंतर मग हिंदु वा मुसलमान वा ख्रिश्चन आहेत.

**औरंगजेब**—हजारवेळां जरी अपयश आलें, तरी मी माझा आदर्श सोडणार नाहीं. माझा आदर्श चुकीचा नाहीं; पण कांहीं चुकत असेल, तर तें माझ्या अक्षमतेमुळेंच असेल असेंच मी म्हणेन. मला पुनः जर भारतांत पाठविलें, तर मी पुनः घोषणा करीन—भारतवासियांनों, तुम्ही प्रथम धार्मिक व मुसलमान व्हा व त्यानंतर मग भारतीय व्हा.

**अकबर**—पण बेटा ! तूं जेव्हां पृथ्वीवर जाशील, तेव्हां तुला दिसून येईल कीं, धर्माचा अर्थच मुळीं पार बदलून गेलेला आहे. माणसाचा दृष्टिकोन अगदीं वेगळा झाला आहे व धर्म म्हणजे मुख्यतः व्यक्तिगत गोष्ट झाली असून, सामूहिक जीवनाचा पाया झाला आहे एकच एक देशात्मभावना !

—नलिनीकांत गुप्त

# अधिक आरोग्यमय जीवनाकडे

आजकाल सर्वत्र लोक आरोग्याविषयीं, निकोप प्रकृतीविषयीं हळुहळु जागरुक होऊं लागले आहेत, हें खरोखरी एक सुचिह्न आहे. ज्यांची प्रकृति निकोप असते, त्यांना ती तशी टिकवावीशी वाटते; आणि ज्यांची वाईट असते, त्यांना ती सुधारावीशी वाटते. खरोखर अशक्त प्रकृति असणें ही गोष्ट जशी व्यक्तीला, तशीच ती राष्ट्रालाहि नुकसानकारक आहे. व्यक्तीचा जीवनांतील स्वाभाविक आनंद ती हिरावून घेते; औषधपाण्यांत व डॉक्टरांचीं बिलें भरण्यांत पैसा खर्च होऊन, आर्थिक बाबतींतहि चिंता करण्याचा प्रसंग येतो. कितीतरी शक्ति रोगानेंच खाऊन टाकली जाते आणि त्यामुळें नित्य-निर्वाहासाठीं, आर्थिक स्वास्थ्य मिळविण्यासाठीं किंवा कांहीं विधायक कार्य करण्यासाठीं आवश्यक व योग्य असेहि श्रम करणें अशक्य होऊन बसतें; समाजामध्यें अशक्त व रोगी मनुष्य वर येऊं शकत तर नाहींच, आणि शिवाय अशक्त प्रकृति ही त्याच्या आध्यात्मिक जीवनांतहि एक मोठी धोंड होऊन बसते. नागरिक या नात्यानेंहि पाहिलें, तर वाईट प्रकृति असणें हें राष्ट्रासहि नुकसानकारकच असतें; कारण राष्ट्राच्या प्रगतीला आणि सुधारणेला रोगी मनुष्य हातभार तर लावूं शकत नाहींच, पण उलट उन्नतीच्या मार्गावर चाललेली राष्ट्राची गती कमी करण्यास तो कारणीभूत होतो.

अर्थात् जरी प्रत्येकाला निकोप प्रकृति पाहिजे असली, तरी ती कशी प्राप्त करून घ्यावयाची हें फारच थोड्यांना माहीत असतें. म्हणून निरामय जीवनाच्या नियमाचें ज्ञान असणें अत्यंत आवश्यक आहे. पण नुसतें ज्ञान असूनहि भागणार नाहीं. खरोखरीच प्रकृति सुधारावी असें वाटत असेल, तर या ज्ञानाचा प्रत्यक्ष उपयोग प्रत्येकांनें केला पाहिजे.

घड्याळासारख्या एखाद्या अत्यंत नाजुक आणि उत्कृष्ट अशा यंत्राशीं शरीराची तुलना करतां येईल. घड्याळानें बरोबर, बिनचूक वेळ दाखवावी म्हणून आपण त्याची जितकी काळजी घेतो, तितकी तरी निदान काळजी, आपलें शरीर सुस्थितींत ठेवण्यासाठीं आपण घेतली पाहिजे. दररोज नियमितपणें आणि ठराविक कालानंतर घड्याळाला किल्ली द्यावी लागते; तें स्वच्छ ठेवून मधून मधून त्याला विशिष्ट प्रकारचें तेल देण्याची जरूर असते; कोणीं त्याच्याशीं धसफस् करूं नये, त्याला हादरे किंवा हिसके बसूं नयेत म्हणून जपावें लागतें. त्याचप्रमाणें शरीराचीं कार्यें सुरळीत चालावीं, म्हणून प्रत्येकानें योग्य ती काळजी घेतली पाहिजे; आणि अशारीतीनें शरीराचे सर्व अवयव जर योग्यपणें चांगलें काम करीत राहतील, तर मग मनुष्याची प्रकृति बिघडण्याचें कांहीं कारणच उरणार नाहीं. आश्चर्य वाटेल, पण लोक आपल्या स्वतःच्या शरीरापेक्षां, आपल्या जवळच्या मौल्यवान् वस्तूंचीच काळजी घेण्यांत अधिक गुंतलेले असतात; आणि स्वतःच्या प्रकृतीच्या बाबतींच अगदींच उदासीन असलेले दिसतात. या हयगयीमुळें ते आजारी पडले आणि त्रास होऊं लागला म्हणजे मग ते डॉक्टरकडे धांव घेतात; पण बरे झाल्यावर पुनः आपल्या जुन्या वळणावर, जुन्या संवयींवर जातात; शरीराची आबाळ करतात, पुनः आजारी पडून डॉक्टरचा दरवाजा गांठतात, असें हें त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत चालतें. शरीराला एखादी गोष्ट अपायकारक

होणार आहे हें कळूनहि, केवळ संवयीमुळें तें तीच गोष्ट पुनः पुनः करीत राहतात आणि वेळ मिळत नाहीं, तितकी गोडी किंवा महत्त्व वाटत नाहीं या सबबीवर, निरोगी जीवनाला आवश्यक अशा संवयी लावून घेण्याचें ते लांबणीवर टाकत राहतात.

शरीराच्या निरनिराळया अवयवांचें कार्य सुसंवादीपणें चालल्यानें, उत्साह व उल्हास वाटणें, सदा आनंदी वृत्ति राहणें, म्हणजे निकोप प्रकृति अशी तिची व्याख्या करतां येईल. अर्थात् शरीराचें असें सुरळीत काम चालण्यासाठीं सर्वच दृष्टींनीं व सर्वच बाबतींत त्याची काळजी घ्यावयास हवी. एकाद्या दुसऱ्या बाबतींतच फक्त प्रयत्न करून भागणार नाहीं. आरोग्यमय जीवनासाठीं खालीं दिल्याप्रमाणें विविध बाबतींत प्रयत्न करणें आणि शरीराला वळण लावणें आवश्यक आहे.

**१. योग्य व्यायाम**—शरीर हें मंदिर आहे. त्याच्या बांधणींत व विकासांत व्यायामाला पायाच्या दगडांइतकें महत्त्व आहे. "व्यायामामुळें रुधिराभिसरणाचा वेग वाढतो, हृदय बलवान् होतें, वाहिन्या स्वच्छ आणि नरम राहतात, शरीरांतील सर्व प्रकारचे मल बाहेर काढून टाकले जातात, फुप्फुसांचें कार्य अधिक चांगलें होऊं लागतें, स्नायु पिळदार व बलवान् तर होतातच, पण शिवाय ते चिवट व नवजवानीनें मुसमुसलेले राहतात, सर्वच अवयव इंद्रियें व शरीरांन्तर्गत ग्रंथी बळकट व कार्यक्षम होतात."

**२. पुरेसा पौष्टिक आहार**—"पौष्टिक, म्हणजेच शरीराचें संवर्धन, संरक्षण व तंदुरुस्ती यासाठीं आवश्यक ते पदार्थ त्याला पुरविणें." चौरस (समतोल) आहारांतील सर्व आवश्यक घटक त्यामध्यें अंतर्भूत असावेत. अर्थात् या आहाराच्या बाबतींत प्रत्येकानें आपलीं तारतम्यबुद्धि वापरली पाहिजे. कारण, देशमान, संवयी, शिक्षण, संस्कार यांनुसार आहारामध्यें फरक पडतो. अर्थात् असें असले तरी निरनिराळया पदार्थांची योग्य निवड व जुळणी करून आपापला प्रमाणबद्ध आहार प्रत्येकाला निश्चित करतां येणें सहज शक्य आहे. मैदा किंवा जीवनसत्त्वविरहित पिठें, किंवा फार स्वच्छ व शुभ्र केलेली साखरं यांचें प्रमाण शक्य तितकें कमींत कमी करून, शक्यतों नैसर्गिक स्वरूपांतील अन्न सेवन करावें. जिभेच्या आवडीनावडीपेक्षां अन्न या दृष्टीनें एकाद्या पदार्थांत किती गुण आहेत हें पाहण्यास शिकलें पाहिजे आणि पौष्टिक, शरीराला अधिक शक्ति देणाऱ्या पदार्थांची आवड मुद्दाम निर्माण केली पाहिजे. शक्य तर चहा, कॉफी, तंबाखू, मद्य इत्यादि पदार्थ संपूर्णपणें वर्ज्य करावेत. भरपूर वेळ हातीं राखून, आनंदी आणि प्रसन्न वृत्तीनें जेवावयास बसत जा; अन्न चांगलें चावून चावून खा. तुम्ही दमले भागलेले, शिणलेले असतांना किंवा घाईगडबडींत असतांना किंवा कांहीं मानसिक विवंचना, ताण अथवा अस्वास्थ्य असतांना, कधींहि जेवण करण्यास बसूं नका. तसेंच खूप व्यायाम करण्यापूर्वीं अथवा नंतर लगेच अन्न घेऊं नका, जेवण झाल्याबरोबर कधींहि स्नान करूं नका.

**३. झोंप व विश्रांति**—आरोग्यासंबंधीं विचार करतांना, पुरेशी झोंप, विश्रांति व स्नायूंना मधून मधून अल्पकाल आवश्यक असलेला आराम या गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत. सामान्यतः श्रमजीवी लोकांना आठ तास झोंप आवश्यक असते. कांहीं लोकांना सहा तासच झोंप पुरेशी होते. शिवाय वाढत्या वयाच्या आणि दिवसभर हालचाल, धांवपळ करणाऱ्यांना कधीं कधीं दहा तास झोंपेची जरुरी असते. मात्र झोंप आणि शिथिलगात्रता (Relaxation)

**यामध्यें** घोंटाळा करून चालणार नाहीं. एकाद्या यंत्राप्रमाणें दिवसभर अखंडपणें मनुष्य कांहीं काम करूं शकणार नाहीं—आणि तसें करूंहि नये. दिवसां मधून मधून थोडथोडा वेळ नाड्यांना, स्नायूंना, मज्जातंतूंना आणि मनाला, थोडीशी स्वस्थता आणि विश्रांति देण्यासाठीं शरीर-अवयव जरा शिथिल करणें याचा निश्चित उपयोग होईल.

**४. आरोग्यदायक संवयी**—स्नान करणें, स्वच्छता राखणें, निरनिराळ्या अवयवांची काळजी घेणें, अनिष्ट संसर्गांपासून शरीराचें रक्षण करणें, शुद्ध हवा व सूर्यप्रकाश घेणें इत्यादि आरोग्यदायी गोष्टी प्रत्येकाच्या अंगवळणीं पडलेल्या असल्या पाहिजेत; तसा स्वभावच बनून गेला पाहिजे. अशा संवयी जडवून घेतल्या तर खरोखर कितीतरी दुखणीं, आजार व बिघाड टळतील.

**५. आंतरिक स्वास्थ्य**—शरीर आणि आंतरिक मानसिक अवस्था यांचा किती निकटचा संबंध असतो, हें सामान्यतः लक्षांत घेतलें जात नाहीं. अर्थात् एकांत कांहीं बिघाड झाला, कीं आपोआपच दुसऱ्यांत अस्वास्थ्य निर्माण होतें. मानसिक ताणामुळें शरीरावर अपायकारक परिणाम होऊं शकतात; नव्हे, कित्येक रोगांचे आणि नैमित्तिक दुखण्यांचें, प्रत्यक्ष नाहीं तरी अप्रत्यक्ष कारण तरी तेंच असतें; आणि म्हणूनच स्वस्थ आणि आनंदी आंतरिक अवस्थेमुळें शरीर-संवर्धनास, बल-संपादनास आणि आयुर्मर्यादा वाढविण्यासहि फार फार मदत होऊं शकते.

ही आंतरिक स्वस्थता लाभण्यासाठीं जीवनव्यवहार योग्यरीतीनें केले पाहिजेत. स्वार्थीपणा, आत्मकेंद्रितता आणि मन-प्राण-शरीर यांच्या संकुचित व अहंप्रधान प्रवृत्ती या नेहमींच आंतरिक प्रसन्नतेला, मनःस्वास्थ्याला विघातक ठरतात. एका विशिष्ट ध्येयाला धरून आपलें जीवन घडविलें पाहिजे आणि दुसऱ्यासाठीं जीवन जगलें पाहिजे. आत्मत्याग, आत्मदान हें जीवनाचें सार असलें पाहिजे. ध्येय हें जितकें उच्च व उदात्त असेल, तितका त्याचा परिणामहि आधिक चांगला होईल. स्वतःच्या वासना आणि महत्त्वाकांक्षा यांची पूर्ति करून, ख़रा आनंद मिळूं शकत नाहीं; तर ज्यावेळीं मनुष्य आपल्या उच्चतम ध्येयासाठीं आपलें सर्वस्व वेंचतो, तेव्हांच हा आनंद नैसर्गिकरीतीनें भरभरून उसळून जीवन व्यापून टाकतो.

—प्रणवकुमार भट्टाचार्य

---

**प्रश्न**—'अहं' चा संघर्ष चाललेल्या या जगाबद्दल मला नावड वाटते.

**उत्तर**—तें स्वाभाविक आहे—मानवी भावनांनीं गजबजलेलें हें जग विरूपच आहे; आणि म्हणूनच तर तें बदलण्याची नितांत आवश्यकता आहे.

—श्रीअरविंद

# साहित्य-सत्कार

**हिंदुस्थानी ख्याल गायकी**––(भाग तिसरा) ले० यशवंत सदाशिव पंडित (मिराशीबुवा) प्रकाशक––मा० य० मिराशी. तानाजी वाडी. पुणें ५. किं. रु. ४. पृष्ठें १८६+६.

भारतीय संगीतशास्त्राचा सखोल अभ्यास करून, प्रस्तुत पुस्तकांत पांच महत्त्वाच्या रागांचें जें सुदीर्घ विवरण केलें आहे, त्यामुळें संगीतप्रेमी आणि संगीतज्ञ यांना निश्चितच गोडी व आनंद वाटेल. यांत ललित, मारवा, पूरिया, जयजयवन्ती, छायानट या रागांतील प्रत्येकीं दोन दोन पदांचें नोटेशन तर दिलेंच आहे पण शिवाय रागाची शास्त्रीय माहिती, प्रत्येक रागाचें मुख्य अंग, प्रत्येक पदाचे आलाप, ताना, बोलताना, ताल, लयींच्या बोलताना देऊन, संगीताच्या अभ्यासकांची उत्कृष्ट सोय करून ठेवली आहे. तानांच्या पायऱ्या स्पष्टपणें दाखविल्या असून, गायनप्रकार या दृष्टीनें 'ख्याल' म्हणजे काय, तिची घडण कशी असते याची फारच चांगली कल्पना या पुस्तकानें येते.

पण नोटेशनची जी पद्धति वापरली आहे, ती सर्वमान्य अशा भातखंड्यांच्या पद्धतीपेक्षां जरा गुंतागुंतीची व अवजड वाटण्याचा संभव आहे. त्याबरोबर हेंहि खरें कीं, केवळ पुस्तकांतील नोटेशनच्या साह्यानें नाविन्यपूर्ण आणि नैसर्गिक संगीत स्फुरूं शकणार नाहीं. त्यासाठीं गुरूच्या चरणीं बसूनच विद्या संपादन केली पाहिजे. तरीहि संगीतकला ही केवळ निवडक लोकांच्या पठडींतून काढून, तिचा सार्वत्रिक उपयोग व्हावा म्हणून लेखकानें जे परिश्रम घेतले आहेत, ते स्तुत्य आहेत याबद्दल दुमत होणार नाहीं. ––आर

★

**'स्वाध्याय मंडळ' पारडी (सुरत) यांचीं प्रकाशनें :––**

**१ श्रीराम पंचायतन–ले. महादेवशास्त्री दिवेकर. पृ. ५० किं. ५० न. पै.**

**२ संतवाणी–संपादक–श्रीपाद जोशी. पृ. ६८, किं. १ रु.**

**३ जागत्या ज्योति. लेखिका–इंदुतनया. पृ. ३६. किं. १ रु.**

**४ हिंदुधर्म दर्शन–(द्वितीय पुस्तक) ले. पं. य. ना. पित्रे. पृ. ११७. किं. १ रु.**

**५ संत तुकाराम महाराजांची चरित्रगंगा––लेखक श्री. पु. ह. गद्रे. पृ. १०६. किं. १॥रु.**

**१ श्रीराम पंचायतन––**

या छोटचाशा पुस्तकांत श्रीराम, सीता, लक्ष्मण, भरत व मारुति या पांच व्यक्तींचें अनुपम विभूतिमत्व सारांशरूपानें रेखाटलेलें आहे. श्रीरामाची सर्वगुणसंपन्नता, सीतेची आदर्श पतिपरायणता, लक्ष्मणाचा अतुलनीय पराक्रम व त्याचें अभूतपूर्व असें बंधुप्रेम, भरताचा सर्वस्वत्याग आणि मारुतीरायाचें बुद्धिवैभव व त्यांचा अलौकिक इंद्रियजय याचें वर्णन आत्यंतिक हळुवारपणें वाचकांना सादर केलें आहे. पंडित महादेवशास्त्र्यांसारखा प्रथितयश बहुश्रुत विद्वान लेखक आणि रामपंचायतनासारखा हृदयाचा ठाव घेणारा विषय यांच्या समन्वयांतून

निर्माण झालेल्या या पुस्तकांत मुखपृष्ठावरील सुंदर चित्र व आंतील आठ रेखाचित्रें हें आकर्षण तर खरेंच, पण शेवटीं सार्थ रामरक्षा देऊन, तसेंच प्रत्येक चरित्रानंतर त्या त्या चरित्रासंबंधीं पाठ करण्याजोगें श्लोक देऊन, त्याची उपयुक्तता अधिकंच वाढविली आहे असें म्हटलें पाहिजे.

हें पुस्तक बालमनांवर अत्युच्च व चिरस्थायी संस्कार करण्यास समर्थ होईल असा आम्हांला विश्वास वाटतो. ——गजराज

*

**२ संतवाणी——**

उत्तर हिंदुस्थानांतील कबीर, तुलसीदास, नानक इत्यादि १७ प्रसिद्ध संतांचे दोहे व त्यांचें सुरस मराठी भाषांतर यांनीं 'संतवाणी' समृद्ध आहे. मराठी रक्ताच्या अणुरेणूंत ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदासादि संतांची प्रासादिक वाणी गुंजत असली, तरी कबीर, तुलसीदास, नानक इत्यादि परप्रांतीय संतांच्या, गूढार्थानें संपृक्त असलेल्या दोह्यांविषयीं मराठी मनाला आकर्षण वाटतें हें कोणी नाकबूल करणार नाहीं. प्रत्येक संताचा संक्षिप्त परिचय देखील करून देण्यांत आला आहे. पुस्तक कोणत्याहि पानावर उघडावें व जणुं कांहीं स्वतःला हवा असलेला दोहाच त्यांत मिळावा असें बरेच वेळां होत असल्यास नवल नाहीं. पुस्तक प्रत्येकानें संग्रहीं ठेवावें असें आहे. ——गजराज

*

**३ जागत्या ज्योति——**

जागत्या ज्योतीमध्यें लेखिकेनें स्फूर्तिप्रद व प्रवाही भाषेंत लिहिलेलीं एकंदर ७० स्त्री-चरित्रें आहेत. पौराणिक कालापासून तों वर्तमानकालापर्यंतचीं हीं इतकीं चरित्रें निवडण्याकरितां लेखिकेला बराच व्यासंग करावा लागला असेल. पण या जागत्या ज्योतींच्या मार्गदर्शनानें आपणांत आजच्या काळांतहि, नवीन पिढींतून तेजस्विनी स्त्रिया निर्माण झाल्यानें तिच्या श्रमांचें चीज, निश्चित होईल. भारतीय इतिहासाचा तेजस्वी नंदादीप अखंड तेवत ठेवण्यासाठीं ज्यांनीं आपल्या जीवन-ज्योती पाजळल्या, त्या वीरांगनांची पुण्यस्मृति हृदयांत सतत जागी ठेवण्यास या पुस्तिकेचें चांगलें साह्य होईल.

*

**४ हिंदुधर्म दर्शन——**

यांत अवघ्या दहा लहानलहान प्रकरणांत आपल्या धर्माच्या तात्त्विक भूमिकेचें दर्शन घडविण्याचा लेखकाचा प्रयत्न बराचसा यशस्वी झाला आहे. जगांत निष्कलंक चारित्र्याचीं माणसें सर्वत्र बहुसंख्येनें नांदावीत, परस्परांचें जीवन हें परस्परसंबंधांत शांति, स्वास्थ्य, सुख व समाधान निर्माण करण्यांत साह्यभूत व्हावें या उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीनें हिंदुधर्म हें कार्य कसें सर्वांगपूर्ण करतो, हें या पुस्तकाच्या वाचनानें समजून येण्यासारखें आहे. या अभ्यासानें तरुण हृदयांत धर्मनिष्ठेचें बीज रुजविलें जाईल अशी खात्री वाटते. यांतील सिद्धान्तरूप बोधवाक्यें व सूक्ति-सुमनावलि लहान मुलांकडून पाठ करून घेण्यासारखी आहे.

*

**५ संत तुकाराम महाराजांची चरित्रगंगा—**

खरोखरीच नांवाप्रमाणेंच पुस्तकांतील चरित्रकथन गंगेच्या प्रवाहाप्रमाणें अखंड असून, गंगास्नानाप्रमाणेंच वाचकाच्या मनास प्रफुल्लता, स्फूर्ति व पावित्र्य यांचा अनुभव देईल, असें परिणामकारक झालें आहे. बुद्धिवादी दृष्टीचेंहि समाधान करण्याचा यांतील यत्न स्तुत्य आहे. शेवटीं महाराजांच्याच शब्दांत दिलेल्या व्याख्या, सुभाषित-वचनें यांचा मनावर सुसंस्कार होण्याच्या दृष्टीनें बराच उपयोग होणारा आहे. लेखकांना भक्तीचा ठेवा देणारे संत विष्णुबोवा जोग यांच्या सहवासानें निर्माण झालेली संतवाङ्मयाविषयींची गोडी लेखकाच्या अशा लेखनामुळें इतरांनाहि लाभावी अशी कोणीहि इच्छा करील. पुस्तकांतील पुष्कळसा भाग तुकाराम महाराजांच्याच तोंडचा असल्यामुळें एकंदर लेखन प्रासादिक वाटतें.

**साभार पोंच**:—१ सोविएत युनियन विषयींचीं १०० प्रश्नोत्तरें.
२ सोविएत युनियनची आरोग्य-व्यवस्था.
३ सोविएत युनियनमध्यें शेती-प्रश्न कसा सोडविण्यांत आला ?
४ सोविएत युनियनमधील शिक्षण-पद्धति.
५ रशियन पाठमाला.
६ सोविएत युनियनमधील मुसलमान
७ सोविएत ट्रेड युनियन्स.

—प्रकाशक, 'सोविएत देश' कार्यालय, अझीझ मंझील, २६ क्लब रोड भायखळा, मुंबई ८.

---

# आश्रम-वृत्त

**शिक्षणविभाग—**

भारतीय भाषा-परिचय व्याख्यान-माला.

२६ एप्रिल रोजीं श्री. व्ही. सदानंद यांचें 'तेलगू वाङमय' या विषयावर व्याख्यान.

१२ मे—'बंगाली काव्यांतील गूढवाद' या विषयावर श्री. नलिनीकांत गुप्त यांचें बंगालींत निबंध-वाचन. प्रथम इंग्रजी सारांश सांगण्यांत आला.

२५ मे—अखिल भारतीय संस्कृत संमेलनाचे अध्यक्ष आचार्य कपिल देव शर्मा यांचें, 'संस्कृत भाषेचें भारतीय संस्कृतींत स्थान व तिचा नित्य व्यवहारांत उपयोग' या विषयावर अति सुलभ संस्कृतमधून व्याख्यान. संस्कृत शिकविण्याची व शिकण्याची सुलभ पद्धत त्यांनीं विशद केली.

२ जून—सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमधील प्राध्यापक, कानडी वाङमयांतील सुप्रसिद्ध लेखक आणि साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळविणारे डॉ. आर. एस्. मुगळी यांचें 'कानडी वाङमय व भारताच्या सांस्कृतिक परंपरेमध्यें तिचा वांटा' यावर व्याख्यान.

दुसरे दिवशीं श्री. मुगळी आणि गुजराथी कवि श्री. नाथालाल दवे यांनीं आपापल्या कांहीं कवितांचें गायन करून दाखविलें.

१० मे–श्री. जे. स्मिथ आणि श्री. अनिलकुमार मुकर्जी यांनीं New world Movement साठीं केलेल्या आपल्या अखिल भारतीय दौऱ्याची माहिती सांगितली.

आश्रमीय पाहुणे मंडळींसाठीं—

श्री. अंबालाल पुराणी यांचें 'सावित्री' वर

श्री. सिद्धेश्वर बॅनर्जी यांचें 'दिव्यजीवन' वर

श्री. अनिलवरण रॉय यांचें 'गीताप्रबंध' यावर—

अशीं व्याख्यानें दर आठवडयास 'ट्रेझर हाऊस'मध्यें नेहमींप्रमाणें चालू आहेत.

**शारीरिक शिक्षण—**

या तिमाहींत मल्लयुद्ध व जलतरणविद्या यांचे सामने झाले. मागच्या वर्षीपेक्षां पोहण्याच्या सामन्यांमध्यें अधिक विद्यार्थ्यांनीं भाग घेतला होता; प्रगतीहि अधिक दिसून आली.

मल्लयुद्ध विषयक सामन्यांमध्यें, एकूण १५७ खेळाडूंपैकीं ५२ कुस्तीसाठीं, ४८ मुष्टि-युद्धासाठीं व ५० लाठीसाठीं नांवें आलेलीं होतीं. त्यापैकीं ७६ मुली होत्या.

पोहण्याच्या शर्यतीमध्यें क्षमतेप्रमाणेंहि गट करण्यांत आले होते—पोहणें, स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग आणि हायबोर्ड डायव्हिंग—सर्व शर्यतींत मिळून ७६ मुलगे व ७० मुली यांनीं भाग घेतला होता. शर्यतीच्या आठव्या दिवशीं पाण्यांतील रिले रेसेस व बदकांचा पाठलाग (Duck Chase) ह्या विशेष प्रेक्षणीय शर्यती झाल्या.

सामन्यांतील यशस्वी खेळाडूंना पारितोषिकें देण्याचा समारंभ दि. ३ मे रोजीं श्रीमाताजीं-च्या हस्तें झाला.

सुप्रसिद्ध भारतीय टेनिस खेळाडु श्री. सुमंत मिश्र यांचा प्रेक्षणीय टेनिस खेळ पहावयास मिळाला.

**कला शिक्षण—**

आधुनिक पद्धतीनें चित्र काढणारे, अमेरिकेंतील एक प्रसिद्ध चित्रकार श्री. एरिक बास यांचें, 'आधुनिक कला (Modarn Art)' या विषयावर फारच उद्बोधक व आकर्षक व्याख्यान झालें.

**ग्रंथालय—**

अनेक महत्वाचे ग्रंथ या तिमाहीमध्यें देणगीरूपानें मिळाले आहेत.

रांची येथील श्री. एच. एन्. गांगुली यांनीं बाल-विभागाला ६३ बंगाली पुस्तकांची भेट दिली.

आंतरराष्ट्रीय स्वरूपाचें कार्य करणाऱ्या, जर्मनींतील एका संस्थेकडून जर्मन भाषा-वर्गा-साठीं आधुनिक गोष्टींचीं पुस्तकें व जर्मन वाङमय आणि जर्मनीमधील निसर्ग-सौंदर्य यांविषयीं चित्रसंग्रह देणगी म्हणून आले आहेत.

आमच्या पुरातन-भाषा विषयांच्या विभागासाठीं श्री. सुरेन्द्रनाथ जौहर यांनीं लॅटिन व ग्रीक भाषेंतील क्रमिक पुस्तकांची एकेक माला मिळवून देण्याची व्यवस्था केली आहे.

भारत सरकारच्या उत्खनन विभागातर्फे भारताच्या इतिहासपूर्व काळांतील संशोधन-विषयक प्रकाशनें मिळालीं आहेत.

भारताच्या स्वातंत्र्य-आंदोलनाविषयीं कांहीं दुर्मिळ ग्रंथ श्री. सुरेन्द्रमोहन घोष (एम्. पी.) यांनीं दिले आहेत.

Bollingem Foundation च्या प्रकाशनाचा संपूर्ण सेट आमच्याकडे आला आहे. त्यामध्यें आणखी महत्त्वाच्या तीन पुस्तकांची भर पडली आहे. त्यापैकीं D. T. Suzuki यांचें 'Zen and Japanese Culture' हें पुस्तक विशेष उल्लेखनीय आहे.

**मनोरंजन—**

३ एप्रिल रोजीं निरनिराळ्या १२ भाषांत श्रीअरविंदविषयक कवितांचें पठण झालें.

२ मे रोजीं मोलियरचें "Les Femmes Savantes" यांतील निवडक भाग, नाटय विभागातर्फे उत्कृष्टरीतीनें रंगभूमीवर करून दाखविण्यांत आले. श्रीमयी यांनीं नाटय-मार्गदर्शन केलें होतें.

११ मे रोजीं हिंदी विभागाच्या विद्यार्थ्यांनीं 'प्रताप प्रतिज्ञा' या हिंदी नाटकांतील कांहीं भाग करून दाखविला.

१ जूनला श्रीमाताजींच्या 'प्रार्थना आणि ध्यान' या पुस्तकांतील प्रार्थनांचें मूळ फ्रेंचमध्यें व श्रीअरविंदांच्या "Last Poems' मधील कांहीं कवितांचे इंग्रजीमध्यें काव्य-पठण झालें.

८ जून रोजीं 'आनंद बझार पत्रिका' या बंगाली दैनिकाच्या बाल-विभागाचे संपादक श्री. विमल घोष (उर्फ मऊमाछी-मधमाशी) यांनीं आश्रमांतील मुलांना गोष्टी सांगून, त्यांची करमणुक केली.

१५ जूनला नवद्वीप येथील 'वंग वाणी' संस्थेंतून आलेल्या शिक्षक-विद्यार्थी यांचा संमिश्र गायन-पठणाचा कार्यक्रम श्रवणीय झाला.

**थोरांच्या भेटी—**

डॉ. बी. डी. लोरिया, युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशनचे एक सभासद, एक दिवस येऊन गेले. इतरहि अनेकांनीं भेटी दिल्या. त्यापैकीं उल्लेखनीय पाहुणे म्हणजे सर्वोदय कार्यकर्ते श्री. जयप्रकाश नारायण हे एक होत.

या शिवाय पुढील व्यक्तींनींहि आश्रमास भेट दिली. येथील रुग्णालयाचे सर्जन जनरल श्री. डॉ. डेनिस आणि सौ. डेनिस. येथील फ्रेंच इन्स्टिटयूशनचे श्री. चार्लस चेकस व त्यांच्या पत्नी आणि लखनौ युनिव्हर्सिटीचे पदार्थविज्ञानशास्त्राचे प्राध्यापक डॉ. मदन.

२४ एप्रिलचा श्रीमाताजींच्या दर्शनाचा कार्यक्रम नेहमींप्रमाणें उत्साहानें पार पडला.

पाँडीचेरीपासून १२ मैलावर सकूरुर या ठिकाणीं New Horizon Sugar Mills Ltd. च्या कारखान्याच्या पायाचा दगड बसविण्याचा कार्यक्रम १२ एप्रिल रोजीं श्रीमाताजींच्या हस्तें झाला. ग्रॅनाईटच्या गुलाबी रंगाच्या दगडावर, श्रीमाताजींनीं दिलेला संदेश त्यांच्या हस्ताक्षरांत कोरवून घेऊन तेथें बसविण्यांत आला.

त्यांनीं दिलेला संदेश—

"श्रद्धा हाच यशाचा खरा निश्चित पाया आहे."

## वाचकांस विनंति

दर्शनदिनास प्रसिद्ध होणारा प्रत्येक अंक प्रसिद्धीनंतर एक आठवड्यानें, म्हणजे अनुक्रमें २१ ऑगस्ट, १ डिसेंबर, १ मार्च आणि १ मे रोजीं रवाना केला जाईल. त्यापूर्वीं वाचकांनीं पत्रव्यवहार करूं नये.

– संपादक

## मराठी प्रकाशनें


१ श्रीअरविंद-दर्शन (वार्षिक मुंबई सर्कल) किं २ रु.

२ योग व त्याचे उद्देश – श्रीअरविंद किं.१२ आणे

३ कारागृहांत श्रीकृष्ण दर्शन (उत्तरपारा भाषण) – श्रीअरविंद किं.४ आणे

४ 'वंदेमातरम्' (लेखसंग्रह) – श्रीअरविंद किं. ४ आणे

५ परम शोध – श्रीमाताजी किं. ६ आणे

६ चार तपस्या व चार मुक्ती – श्रीमाताजी किं. १२ आणे

७ महान् रहस्य (नाटिका) – श्रीमाताजी किं.१ रु.

८ श्रीअरविंदांचा संदेश व आश्रम कि.१२ आणे

९ बाळ गंगाधर टिळक – श्रीअरविंद किं. ८ आणे

१० खेडीं हा स्वराज्याचा पाया (व्याख्यान) – श्रीअरविंद किं. ४ आणे

११ दिव्य जीवन (संकलित वेचें) – श्रीअरविंद किं. २५ न.पै.

१२ सत्यगिरीचें आरोहण (नाटिका) – श्रीमाताजी किं. ५० न.पै.

ट.ख.वेगळा

श्रीअरविंद सर्कल ३९१ सदाशिव पुणे २.

'संजीवन कार्यालय' श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी